मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in  E mail - dainikyuvakaadhar@gmail.com  facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३० ■ शनिवार, १७ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514








# पनवेल महानगरपालिकेत भाजप महायुतीचा दणदणीत विजय

## शेकाप महाविकास आघाडीचा सपशेल पराभव









**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) महायुतीने दणदणीत विजय मिळवत पनवेल महानगरपालिकेवर पुन्हा एकदा एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांनी शेकाप महाविकास आघाडीचा सपशेल पराभव केला. मतदानापूर्वी भाजप महायुतीच्या सहा तर एक अपक्ष जागा बिनविरोध झाली होती. त्यानंतर गुरुवारी ७१ जागांसाठी झालेल्या मतदानाचा निकाल आज (शुक्रवारी) जाहीर झाला. यामध्ये ५३ जागांवर भाजप महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी होऊन भाजप महायुतीने एकूण ५९ जागा जिंकल्या. त्यामुळे पुन्हा एकदा विरोधकांना पराभवाची धूळ चारून पनवेल महापालिकेवर भाजप महायुतीचा झेंडा फडकवण्यात आमदार प्रशांत ठाकूर सरस ठरले आहेत.

ही निवडणूक पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रभारी माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली लढविण्यात आली. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी तसेच जिल्हाध्यक्ष



अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली भाजप महायुतीने नियोजनबद्ध व संघटित प्रचार केला. विकासकेंद्रित धोरण, सक्षम नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची ताकद यामुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाला.पनवेलकर सुज्ञ मतदारांनी महायुतीवर दाखवलेला प्रचंड विश्वास तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी घेतलेली अथक मेहनत हे या यशामागील प्रमुख कारण ठरले आहे. स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अपेक्षा आणि पनवेलच्या सर्वांगीण विकासाचा ठोस आराखडा मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात महायुती यशस्वी ठरली. सर्व विजयी उमेदवारांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह



महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

विजयानंतर संपूर्ण पनवेल शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. “भाजप महायुतीचा विजय असो”,“लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विजय असो”,“एकच वादा प्रशांत दादा”,“आमदार महेश बालदी आगे बढो, हम तुम्हारे साथ है”

अशा जयजयकाराच्या गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या विजयामुळे पनवेल शहराच्या विकासाला नवी गती मिळणार असून, नागरिकांच्या समस्या सोडवणे, मूलभूत सुविधा मजबूत करणे आणि पनवेलला आदर्श शहर बनवण्यासाठी भाजप महायुती कटिबद्ध असल्याचे नेत्यांनी यावेळी सांगितले.

बिनविरोध - नितीन जयराम पाटील (प्रभाग १८), ममता प्रितम म्हात्रे (प्रभाग १८), दर्शना भगवान भोईर(प्रभाग १९), रुचिता गुरुनाथ लोंढे (प्रभाग १९), अजय तुकाराम बहिरा (प्रभाग २०), प्रियांका तेजस कांडपिळे (प्रभाग २०)

प्रभाग ०१- विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नितेश बाळकृष्ण फडके

प्रभाग ०४- प्रवीण काळुराम पाटील, परेशा ब्रिजेश पटेल, अनिता वासुदेव पाटील, मधू पाटील

प्रभाग ०५ - शत्रुघ्न अंबाजी काकडे, मिनल विजय पाटील

प्रभाग ०६ - उषा अजित अडसुळे, नरेश गणपत ठाकूर, सोनल कीर्ती नवघरे, समीर चंद्रकांत कदम

प्रभाग ०७ - अमर अरुण पाटील, प्रमिला रविनाथ पाटील, मनाली अमर ठाकूर, राजेंद्रकुमार शर्मा

प्रभाग ०८- बबन नामदेव मुकादम, बायजा बबन बारगजे, सायली तुकाराम सरक, रामदास वामन शेवाळे

प्रभाग ०९- महादेव जोमा मधे, प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती निलेश भोईर, शशिकांत शनिवार शेळके

प्रभाग १० - रविंद्र अनंत भगत, सरस्वती नरेश काथारा, मोनिका प्रकाश महानवर, विजय मनोहर खानावकर

प्रभाग ११- प्रदीप गजानन भगत, हॅप्पी सिंग

> “ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली देशात विकासाची नवी दिशा मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाची मजबूत पायाभरणी केली. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संघटन बळकट करत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रेरणेमुळेच पनवेल महानगरपालिकेत भाजप महायुतीला हा दणदणीत विजय मिळू शकला. हा विजय म्हणजे विकास, विश्वास आणि सक्षम नेतृत्वावर पनवेलकरांनी दिलेली ठाम शिक्कामोर्तब आहे. नागरिकांना अपेक्षित विकास करण्याचा आम्ही संकल्प कायम केला आहे, त्यामुळे यापुढे विकासाचा झंझावात कायम ठेऊ.
>
> - आमदार प्रशांत ठाकूर

**शेकाप महाविकास आघाडीने प्रचारात फक्त टीका आणि फेक नेरेटिव्ह पसरवले होते. तर भाजप महायुती केलेल्या कामाचा आढावा मांडून लोकांपुढे जात होते. त्यामुळे यावेळीही सुज्ञ मतदारांनी महाविकास आघाडीवर विश्वास ठेवला नाही आणि त्याचा परिपाक म्हणून भाजप महायुतीने मोठा विजय मिळवला.**

प्रभाग १२- कुसुम रवींद्र म्हात्रे, दिलीप बाळाराम पाटील

प्रभाग १३- हेमलता गोवारी, शिला भाऊ भगत, विकास नारायण घरत, रविंद्र गणपत जोशी

प्रभाग १५- एकनाथ रामदास गायकवाड, सीता सदानंद पाटील, कुसुम गणेश पाटील, दशरथ बाळू म्हात्रे

प्रभाग १६- राजेश्री महेंद्र वावेकर, कविता किशोर चौतमोल, समीर बाळशेठ ठाकूर, संतोष गुन्डाप्पा शेट्टी

प्रभाग १७- प्रकाश चंदर बिनेदार, अस्मिता जगदीश घरत, शिवानी सुनिल घरत, मनोज भुजबळ

प्रभाग १८ - प्रिती जॉन्सन जॉर्ज

प्रभाग १९ - सुमित उल्हास झुंझारराव, चंद्रकांत (राजू) सोनी

प्रभाग २० - श्वेता सुनिल बहिरा

# मुंबईत महापौर बसल्यानंतर जल्लोष साजरा करूया! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :**

मुंबई महानगरपालिकेत महापौर बसल्यानंतर पुन्हा एकदा जल्लोष साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले. राज्यातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये मिळालेल्या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर ते भाजपच्या प्रदेश कार्यालयात आयोजित जल्लोष कार्यक्रमात बोलत होते. पक्षासाठी २४ तास काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा विजय समर्पित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महाराष्ट्राचे भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगल प्रभात लोढा, राधाकृष्ण विखे पाटील आणि मुंबईचे अध्यक्ष अमित साटम यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वप्रथम मी महाराष्ट्राच्या जनतेचे मनापासून आभार मानतो, कारण महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीला मोठा विजय त्यांनी मिळवून दिला. या निवडणुकांमध्ये सगळे रेकॉर्ड तोडले गेले असून, २९ पैकी २५ महानगरपालिकांमध्ये भाजप किंवा महायुतीची सत्ता आली आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. जरी मतमोजणीला उशीर होत असला आणि काही मतमोजणी बाकी असली तरी विद्यमान ट्रेंड पाहता, महायुतीला निश्चितपणे पूर्ण बहुमत मिळेल आणि मुंबई महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकेल, याबाबत कोणतीही शंका नाही.

ते पुढे म्हणाले की, या निवडणुकीत आम्ही विकासाचा अजेंडा घेऊन जनतेसमोर गेलो होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या अजेंड्याला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये आम्हाला रेकॉर्डब्रेक जनमत मिळाले आहे. त्यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली, की लोकांना विकास आणि प्रामाणिकता हवी आहे. म्हणूनच लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे.





आज या निकालाने आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली, की महाराष्ट्राचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच आहे. या निकालाच्या निमित्ताने मी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेही स्मरण करतो, कारण त्यांचा आशीर्वाद महायुतीच्या पाठीशी होता आणि म्हणूनच हा विजय मिळाला आहे.

**आमचे हिंदुत्व संकुचित नाही!**

ज्या मुद्द्यांवर आम्ही ही निवडणूक लढलो, त्या मुद्द्यांना लोकांनी प्रतिसाद दिला आणि पुढेही आमचा अजेंडा विकासाचा राहणार आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. एकेका शहराला परिवर्तित करून तेथे राहणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या जीवनात मोठा बदल घडवण्यासाठी हा विजय आम्ही समर्पित करणार आहोत. - या सगळ्या प्रक्रियेत एक गोष्ट सांगितली पाहिजे की आमचा कार्याचा आत्मा आणि विचारांचा आत्मा हिंदुत्ववाद आहे. आम्ही हिंदुत्ववादी आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. हिंदुत्व आणि विकास यांना वेगळे करता येणार नाही. आज हा आमचा आत्मा आम्हाला जनसामान्यांपर्यंत पोहोचवतो आहे. - आम्ही संकुचित हिंदुत्व मानणारे नाही, तर व्यापक हिंदुत्व मानणारे आहोत. आमच्या हिंदुत्वात सगळ्यांचा समावेश आहे. जो जो भारताच्या संस्कृतीला आपली संस्कृती समजतो आणि भारतीय प्राचीन जीवनपद्धतीला आपली जीवनपद्धती मानतो, त्याची पूजा पद्धती कशीही असली तरी त्यांना आम्ही आमच्या हिंदुत्वाच्या व्याख्येत समाविष्ट करतो. म्हणूनच या निमित्ताने इतके मोठे जनसमर्थन मिळाले आहे.

**जिंकल्याचा उन्माद नको**

कार्यकर्त्यांना संदेश देताना फडणवीस म्हणाले की, इतके मोठे जनसमर्थन मिळाल्याने आता जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्याला जबाबदारीने वागावे लागेल. जिंकल्यानंतर उन्माद नको, कोणीही उन्मादात वागणार नाही हे कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आमचा संदेश आहे की जनतेने विश्वासाने तुम्हाला निवडले आहे, त्यामुळे या विश्वासाला तडा जाणार नाही असे वर्तन करा. मला विश्वास आहे की कार्यकर्ते, नेते आणि निवडून आलेले नगरसेवक हे करणार आहेत. - मुंबई महापौर विराजमान झाल्यानंतर पुन्हा जल्लोष साजरा करू, असे सांगत फडणवीस यांनी आपले मित्र पक्षांचेही आभार मानले. शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि इतर मित्र पक्षांचे मनापासून आभार. इथे येण्यापूर्वी मी एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून संवाद साधला. त्यांनी माझे अभिनंदन केले, मी त्यांचे अभिनंदन केले. पुन्हा एकदा महाराष्ट्रात महायुती मजबुतीने काम करेल, हा विश्वास देतो.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह ठाकुर :** स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय, रिसोड येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त बुधवार दि. १४ जानेवारी २०२६ रोजी भव्य ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन प्रसिद्ध कवी व नामवंत निवेदक चाफेश्वर गांगवे यांच्या शुभहस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. संजय उखळकर होते, तर प्राचार्य कमलाकर टेमधरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी विविध मराठी साहित्यप्रकारांतील ग्रंथांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती. या ग्रंथप्रदर्शनामध्ये मराठी साहित्याची परंपरा, संत साहित्य, आधुनिक काव्य, कथा-कादंबऱ्या, चरित्रे, बालसाहित्य तसेच अभ्यासपूर्ण संदर्भग्रंथ यांचा समावेश करण्यात आला होता.यावेळी उपस्थितांना संबोधित करताना कवी चाफेश्वर गांगवे यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सखोल आणि प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषेचा गौरव करताना तिच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भावनिक मूल्यांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला साहित्यप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक, नागरिक व वाचनालयाचे सदस्य अशा असंख्य श्रोत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालीकराम पठाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. रवी अंभोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाच्या कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले.

मराठी भाषा संवर्धनाविषयी कवी



चाफेश्वर गांगवे यांचे विस्तृत मनोगत

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली संस्कृती, आपली ओळख आणि आपल्या विचारांची शिदोरी आहे, असे प्रतिपादन कवी चाफेश्वर गांगवे यांनी केले. त्यांनी सांगितले की, "मराठी भाषा ही संत, शाहिर, कवी, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांनी समृद्ध केलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते आधुनिक काळातील साहित्यिकांपर्यंत मराठीने माणसाला माणूस म्हणून घडवण्याचे कार्य केले आहे."

आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानप्रधान युगात मराठी भाषेला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. इंग्रजीचे वाढते आकर्षण, मातृभाषेकडे दुर्लक्ष आणि दैनंदिन व्यवहारात मराठीचा कमी होत चाललेला वापर याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली. "घरात, शाळेत आणि समाजात मराठीचा अभिमानाने वापर झाला, तरच ही भाषा टिकेल आणि वाढेल," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

पुस्तकवाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले की, "वाचनसंस्कृती ही भाषेच्या संवर्धनाची खरी गुरुकिल्ली आहे. ग्रंथालये ही ज्ञानाची देवळे आहेत आणि येथे येणारा प्रत्येक वाचक हा भाषेचा खरा सेवक आहे."

त्यामुळेच अशा ग्रंथप्रदर्शनांमधून तरुण पिढीला मराठी साहित्याशी जोडण्याची नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

मराठी भाषेचा वापर केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता, दैनंदिन जीवनात, व्यवहारात, सोशल मीडियावर आणि नव्या माध्यमांमध्येही प्रभावीपणे व्हावा, असे आवाहन त्यांनी केले. "आपण मराठीत विचार केला, मराठीत बोललो आणि मराठीत लिहिले, तरच मराठी भाषा खऱ्या अर्थाने जिवंत राहील," असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.

भाषा जपणे म्हणजे स्वतःचे अस्तित्व जपणे होय, असे सांगत त्यांनी प्रत्येक मराठी माणसाने भाषेविषयी कृतिशील भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. त्यांच्या या विचारपूर्ण आणि प्रेरणादायी मनोगताने उपस्थित श्रोते भारावून गेले.

# कॅनॉइंग विभागीय स्पर्धेसाठी निफाडच्या १४ विद्यार्थ्यांची दिमाखदार निवड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी/निफाड :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन कॅनॉइंग स्पर्धेत मविप्र समाजाच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या एकूण १४ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या यशासह सर्व १४ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सायखेडा येथे नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत मविप्र समाजाच्या के. टी. एच. एम. महाविद्यालय, कर्मवीर काकासाहेब वाघ पिंपळगाव महाविद्यालय, कर्मवीर



गणपत दादा मोरे महाविद्यालय (निफाड) तसेच श्री स्वामी षटकोपाचार्यजी महाराज महाविद्यालय (सायखेडा) यांच्या बोट क्लब संघांनी सहभाग घेतला.

के–१, के–२ आणि के–४ या क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य सादर करत सामने चुरशीचे व चित्तथरारक केले. या सर्व प्रकारांत निफाड महाविद्यालयातील १४ खेळाडूंनी सहभाग नोंदवून सर्वच प्रकारांत अव्वल कामगिरी केली.

या विद्यार्थ्यांना शा.शी. संचालक चंद्रशेखर मोरे व चेतन कुंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासजी मोरे, सरचिटणीस ॲड. नितीनजी ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक शोभाताई भागवत बोरस्ते, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे तसेच महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व सेवकवृंद यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# १६ जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा .पाटील जुनियर कॉलेज जासई, या विद्यालयात १६ जानेवारी हा दिवस १९८४ च्या शौर्यशाली व गौरवशाली लढ्यात हुतात्मा झालेल्या हुतात्मा रघुनाथ अर्जुन ठाकूर, हुतात्मा केशव महादेव पाटील, हुतात्मा महादेव हरी पाटील, हुतात्मा नामदेव शंकर घरत, हुतात्मा कमलाकर कृष्णा तांडेल या हुतात्म्यांना श्रद्धांजली , मानवंदना कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर व पंचक्रोशीतील लोक उपस्थित होते. शाळेच्या




मुख्याध्यापिका सौ के जी म्हात्रे मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी १९८४ च्या लढ्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण केले. तसेच हुतात्मा स्मारकास चक्र अर्पण करण्यात आले .शाळेच्या प्रांगणात असणाऱ्या महान विभूतींच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. शिक्षण महर्षी कर्मवीर अण्णा यांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पर अर्पण करण्यात आले. दिवंगत लोकनेते दि बा पाटील साहेबांचा पूर्ण कृती पुतळ्यास पुष्पहार मान्यवरांनी अर्पण केले .त्यानंतर सर्व मान्यवरांनी हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी असणाऱ्या ज्योतीचे पूजन करून ज्योत प्रज्वलित केली. ए .सी कॉलेज पनवेल येथून आलेल्या एन सी सी च्या विद्यार्थ्यांनी हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. उपस्थित मान्यवरांचे आभार मानून हा कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेचे प्राध्यापक श्री गाताडी सर, उपशिक्षिका श्रीमती घरत मॅडम व सौ वर्तक मॅडम यांनी केले.

# हतेडी खुर्दच्या मैदानात महिला मुख्याध्यापिकेची दहाड; विद्यार्थ्यांना कबड्डीचा रणसंग्राम!"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी केवळ वर्गखोल्या पुरेशा नसून मैदानाचीही तितकीच गरज आहे, हे बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शिल्पा सुनील सरकटे यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. महिला मुख्याध्यापिका स्वतः मैदानात उतरून विद्यार्थ्यांना कबड्डीचे धडे देताना दिसत असल्याने शाळेचे वातावरणच प्रेरणादायी बनले आहे.

सौ.शिल्पा सरकटे या केवळ अध्यापन आणि प्रशासनापुरत्या मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास,शिस्त



आणि संघभावना वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.त्यांच्या या धाडसी व सकारात्मक भूमिकेमुळे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने कबड्डीचा सराव करत असून ग्रामीण भागातील मुलांमध्येही खेळाविषयी नवी उमेद निर्माण झाली आहे.

या उपक्रमाला सहाय्यक शिक्षिका कु.अनिता किसन कापडे यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्या विद्यार्थ्यांना खेळातील नियम, शिस्त आणि संघभावनेचे महत्त्व समजावून सांगत आहेत. तसेच शाळेशी संलग्न असलेल्या उत्कृष्ट अंगणवाडी सेविका शालिनी सरकटे या विद्यार्थ्यांच्या पोषण, उपस्थिती आणि प्राथमिक सवयी विकसित करण्यासाठी सक्रिय योगदान देत आहेत.

महिला नेतृत्वाखाली चालणारा हा उपक्रम केवळ खेळापुरता मर्यादित न राहता ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा देणारा ठरत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी खुर्द शाळेचा हा प्रयोग इतर शाळांसाठीही निश्चितच आदर्श ठरणारा आहे.

मैदानात उभी राहिलेली 'आई' त्या दिवशी शाळेचे मैदान नेहमीसारखे नव्हते पायात चप्पल चेहऱ्यावर आत्मीय हसू आणि डोळ्यांत विश्वास घेऊन मुख्याध्यापिका सौ. शिल्पा सुनील सरकटे विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहिल्या.हातात सिटी नव्हती. तरीही प्रत्येक मुलांचे कान त्यांच्या आवाजाकडे झुकलेले होते.कारण त्या फक्त मुख्याध्यापिका नव्हत्या... त्या त्या क्षणी आईसारख्या मार्गदर्शक होत्या..

# जिल्हाधिकारी कार्यालयात लाडक्या बहिणीचे पैसे तात्काळ देण्यात यावे याकरिता महिलांचे ठिय्या आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** लाडक्या बहिणीचे २ महिन्याचे पैसे तात्काळ देण्यात यावे याकरिता आज दिनांक १६जानेवारी २०२६ ला जिल्हाधिकारी कार्यालयात महिलांनी लाडक्या बहिणीचे पैसे न मिळाल्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच महिलांनी ठिय्या आंदोलन करून पैसे तात्काळ देण्यात यावे याकरिता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्याकडे एकच मागणी केली. सदर प्रतिनिधीशी

बोलताना त्यांनी सांगितले की, आम्ही



केवायसी केलेली आहे आणि आम्ही गरीब कुटुंबातील असून आम्ही शेत मजुरी करून उदरनिर्वाह करतो .परंतु देवा भाऊ आमच्याशी दुजाभाव का करतो.

मागील दोन महिन्यापूर्वी आम्हाला पैसे मिळत होते .परंतु आता दोन महिन्यापासून आम्हाला लाडक्या बहिणीचे पैसे मिळाले नाही.याचा जाब विचारण्याकरिता महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच हे ठिय्या आंदोलन केले.

# वाळकी बु. येथील संदेश रमेश सावते यांची केंद्रीय सुरक्षा दलात उल्लेखनीय वाटचाल

**दैनिक युवक आधार**

**विश्वदीप कांबळे प्रतिनिधी हदगाव :** हदगाव तालुका, नांदेड जिल्ह्यातील वाळकी बु. येथील युवक संदेश रमेश सावते सध्या बॉर्डर सिक्युरिटी फोर्स (BSF) मध्ये गांधीनगर येथे तैनात असून त्यांच्या यशस्वी कारकिर्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संदेश सावते यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर सन 2022 मध्ये प्रथम महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्स (MSF) मध्ये निवड मिळवली. त्यानंतर 2023 मध्ये SSC GD परीक्षेद्वारे बॉर्डर सिक्युरिटी फोर्स (BSF) मध्ये निवड होऊन ते देशसेवेत कार्यरत झाले. विशेष म्हणजे 2026 मध्ये पुन्हा SSC GD मधून त्यांची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल



(CISF) मध्येही निवड झाली आहे.

ग्रामीण भागातून येऊन केंद्रीय सुरक्षा दलांमध्ये यशस्वी वाटचाल करणाऱ्या संदेश सावते यांनी तरुणांसमोर आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशामुळे वाळकी बु. गावासह हदगाव तालुका व नांदेड जिल्ह्याचा नावलौकिक वाढला असून कुटुंबीय, नातेवाईक व ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सिकलसेलमध्ये पिडीतानी - पिडीत व वाहकांनी - वाहकाच्या सोबत विवाह टाळावे - सहदेव चंद्रशेखर

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशि/ गजानन पवार पाटील :** प्राथमिक आरोग्य केंद्र उकळीपेन येथे आज दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी अरुणोदय सिकलसेल विशेष मोहीम या मोहिमेचे उद्घाटन कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये ग्राम उकळीपेन येथील माजी सरपंच श्री वामनराव अंभोरे तसेच वंचित बहुजन आघाडीचे वाशिम तालुका अध्यक्ष श्री दिलीप भगत हे होते

शिकलसेल आजारा संदर्भात उद्घाटन प्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र उकळीपेनच्या वैद्यकीय अधिकारी डॉ संध्या मनवर मॅडम . डॉ सेजल खंडारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

अरुणोदय शिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमा ची रूपरेषा तसेच फायदे तोटे आपल्या भाषणात श्री. सहदेव उत्तमराव चंद्रशेखर आरोग्य सहाय्यक यांनी सिकलसेल आजारा विषयी माहिती दिली .

सामान्य लाल रक्तपेशी वर्तुळ आकाराची असते व

सिकलसेल लाल रक्तपेशी विळ्याच्या आकाराच्या असतात

**लक्षणे**

अशक्तपणा.सांधेदुखी, सांधे सुजणे.शरीर पिवळसर होणे.असहय वेदना होणे

लहान बालकांना वारंवार जंतुसंसर्ग होणे इत्यादी

**तपासणी**

बोटातून दोन थेंब रक्त घेऊन सोल्युबिलीटी चाचणी केली जाते. ही चाचणी पॉझिटीव्ह असल्यास हिमोग्लेबीन इलेक्ट्रोफोरेसीस चाचणी केली जाते प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मोफत चाचणी केली जाते.

**सिकलसेल टाळु शकतो**

सिकलसेल विषयी अचुक माहिती मिळवा.सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमात मोफत रक्त तपासणी (सोल्युबीलीटी टेस्ट व इलेक्ट्रोफोरेसीस) होते.सकलसेल वाहक व ग्रस्त रुग्णास मोफत समुपदेशन, औषधोपचार व संदर्भसेवा उपलब्ध आहेत.सिकलसेल रुग्णांसाठी जिल्हा रुग्णालयात मोफत रक्त संक्रमण करण्यात येते.

**क्षमता:** लग्न ठरविण्यापूर्वी मुलगा व मुलगी दोघांचीही रक्ताची तपासणी करून घ्या.असे विवाह टाळा- दोघेही वाहक असतील तर एक वाहक व एक ग्रस्त असेल तर दोघेही ग्रस्त असतील तर कारण



त्यांच्या होणा या अपत्याला हा आजार होऊ शकतो सर्व सिकलसेल आजारी रुग्णांना फॉलिक ॲसिड गोळया मोफत पुरविणे रुग्णांना वेदना नाशक औषधे देणे. जंतुसंसर्ग झाल्यास अँटीबायोटिक देऊन उपचार करणे.गुंतागुंतीच्या रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालयात हलविणे..रक्त संक्रमणाची गरज असणा या रुग्णांना जिल्हा रुग्णालयात रक्त संक्रमणाची सोय उपलब्ध करणे.सर्व रुग्णालयांना रुग्णांसाठी स्वतंत्र औषधे पुरविण्यात येत आहे. तसेच 1 ते 40 वयोगटातील लाभार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्याकरिता

वाचकांनी वाहकासी व पिडीतानी पिडीतशी विवाह टाळावेच जेणेकरून सिकलसेल आजाराची साखळी खंडीत होईल व खऱ्या अर्थाने ही मोहीम यशस्वी होईल यात शंका नाही या

उद्घाटन प्रसंगी आरोग्य सहाय्यिका आशाताई प्रधान मॅडम औषधी निर्माण अधिकारी सपना आढाव मॅडम आरोग्य सहाय्यक विजय गोटे उकळीपेन उपकेंद्राचे आरोग्य सेवक प्रमोद नप्ते आरोग्य सेविका ओपीडी नेहा पडघन कनिष्ठ सहायक गणेश शिंदे परिचर शुभम सुरदुशे.गोटे.महादेव सुरुशे डाटाएन्ट्री ऑपरेटर श्री कावरखे यांचे सह उकळी पेन येथील गावकरी बहुसंख्येने तसेच अधिकारी.कर्मचारी उपस्थित होते.

# सी. के. टी. महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाद्वारे 'बायोटोपिया २०२६: अंतर महाविद्यालयीन शैक्षणिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** माननीय श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून (अमृत महोत्सवी वर्षानिमित्त) चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त)यांच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने दोन दिवसीय 'बायोटोपिया २०२६: अंतर महाविद्यालयीन शैक्षणिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देशविद्यार्थ्यांना विविध संवादात्मक आणि मनोरंजक स्पर्धांच्या माध्यमातून त्यांची वैज्ञानिक क्षमता,सर्जनशीलता, सांघिक भावना आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी केवळ संकल्पनाच शिकल्या नाहीत, तर शैक्षणिक मनोरंजक कार्यक्रमांसोबतच आकर्षक रोख पारितोषिकेही जिंकली.

उद्घाटन समारंभ प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी.अघाव, विज्ञान विभागाच्या प्रभारी डॉ. जे. एस. ठाकूर, आणिजैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख व दोन दिवसीय 'बायोटोपिया' कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. सीमा कोकितकर यांच्या शुभहस्ते विभागीय सभागृहात पार पडला. यावेळी पिल्लई कॉलेज, पनवेल येथील बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या विभागप्रमुख आणि सहाय्यक प्राध्यापक श्रीमती सुपर्णा दीपक या 'बायोटोपिया' कार्यक्रमासाठी बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात मुंबई आणि नवी मुंबई विभागातील १० वेगवेगळ्या महाविद्यालयांतील २०० हून अधिक पदवी आणि पदव्युत्तर विज्ञान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. शर्मिला घंगाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



'बायोरंगोळी' हे एक प्रमुख आकर्षण होते, जिथे सहभागींनी पेशींची रचना, डीएनए हेलिक्स, सूक्ष्मजीव, वनस्पती घटक आणि पर्यावरणीय प्रणालींपासून प्रेरित होऊन दृश्यात्मक दृष्ट्या अप्रतिम रांगोळीच्या नक्षीकाम तयार केले. या उपक्रमाने कला आणि विज्ञानाचा सुंदर मिलाफ साधला, ज्यामुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि संकल्पनात्मक समज दिसून आली.बहुप्रतिक्षित 'बायोक्विझ' अनेक फेऱ्यांमध्ये आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आण्विक जीवशास्त्र, अनुवंशशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैव रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञानाचे उपयोजन आणि अलीकडील वैज्ञानिक घडामोडींमधील ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. रॅपिड-फायर आणि बझर फेऱ्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले, ज्यामुळे हे महोत्सवातील सर्वात उत्साही सत्रांपैकी एक ठरले. विद्यार्थ्यांनी 'बायोशेराज'मध्ये सक्रिय सहभाग घेऊन वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्षात सादर केल्या.

ज्यांना बौद्धिक आव्हाने आवडतात, त्यांच्यासाठी 'बायोरिडल'ने एक मजेदार आणि उत्सुकतापूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले, जिथे विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र-आधारित कोडी आणि प्रश्न सोडवले. या उपक्रमाने कल्पक विचारसरणीला प्रोत्साहन दिले आणि वैज्ञानिक संकल्पनांना आकर्षक व सुलभ बनवले. साहसी 'ट्रेझर हंट' ने संपूर्ण कॅम्पसमध्ये उत्साहाची लाट आणली. सहभागींनी वैज्ञानिक तथ्ये, प्रयोगशाळेतील सूचना आणि पर्यावरणीय संकेतांचा वापर करून अंतिम ठिकाणापर्यंत पोहोचले. या कार्यक्रमाने सांघिक कार्य, रणनीती आणि निरीक्षण कौशल्यांना प्रोत्साहन दिले.

वैज्ञानिक सर्जनशीलतेला आधुनिकतेची जोड देत, 'क्लिकोफिलिक'ने जैविक छायाचित्रणावर लक्ष केंद्रित केले. विद्यार्थ्यांनी सूक्ष्म, पर्यावरणीय आणि प्रायोगिक प्रतिमा टिपल्या, ज्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे सौंदर्य अधोरेखित केले.

जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख व दोन दिवसीय 'बायोटोपिया' कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. सीमा कोकितकर यांच्यासह बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या सर्व प्रध्यापक वृंद, श्री. सुशीलकुमार घाडगे, श्रीमती लतिका चव्हाण, डॉ. शर्मिला घंगाळे, डॉ. रुपाली नानेकर, श्रीमती भावना सूर्यवंशी, डॉ. अनुप्रिता वाठारकर ,श्रीमती माधुरी वैशंपायन, श्रीमती दिप्ती पाटील आणि श्रीमती वैष्णवी वेताळ यांनी विशेष मेहनत घेतली.महोत्सवाची सांगता पारितोषिक वितरण समारंभाने झाली, याप्रसंगी विजेत्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल रोख पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. अनुप्रिता वाठारकर यांनी आभार प्रदर्शन केले.

# रक्तदान आणि अन्नदान हे पुण्याचे काम : महेंद्र घरत

**दैनिक युवकआधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी महेंद्रशेठ घरत यांनी रक्तदान केले. साई मंदिरात अन्नदान आणि रक्तदान हा दुग्धशर्करा योग साधणारे महेंद्रशेठ घरत हे राजकीय आणि सामाजिक समतोल साधणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. हे त्यांनी आज केलेल्या रक्तदानातून दाखवून दिले. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले', असे म्हणतात ते महेंद्र घरत यांना तंतोतंत लागू होते. त्यांनी साई मंदिरात रक्तदान शिबिरात मार्गदर्शन केले. "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मी गेली अनेक रक्तदान करतोय. अनेकांचे जीव त्यामुळे वाचतात. त्यामुळे रक्तदान आणि अन्नदानासारखे पुण्य नाही. त्यामुळे मी आज दोन्ही गोष्टी एकाच वेळी करतोय. यात मला आनंद आहे. साई मंदिराच्या व्यासपीठावर अनेक समाजोपयोगी




उपक्रम आणि कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होत आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे."

श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या अनुयायांनी वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी साई मंदिर वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील यांनी महेंद्रशेठ घरत यांचे स्वागत केले आणि रक्तदान केल्याबद्दल अभिनंदन केले.

# पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 प्रमाणे मनाई आदेश जारी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.13 जानेवारी 2026 रोजीचे अधिसुचनेनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक सन-2026 करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये दि. 16 जानेवारी 2026 रोजी पासून दि.21 जानेवारी 2026 रोजी पर्यत निवडणुक कार्यक्रमांनुसार उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे. तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दि.27 जानेवारी 2026 आहे. त्याअनुषंगाने, विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यामध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे.

त्याकरिता पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मि नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये तहसिलदार कार्यालय, जुना ठाणा नाका रोड, साईनगर, पनवेल, जि. रायगड व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्त सिडको प्रशिक्षण केंद्र, सेक्टर नं. 30, बोकडविरा, उरण, जि.रायगड यांच्या कार्यालयाचे 100 मीटर परिक्षेत्रात पुढीलप्रमाणे बंदी आदेश जारी केला आहे.

नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना उमेदवारांना फक्त दोन वाहने घेवून जाता येतील. कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास, कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे. ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.. कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर चिटकवण्यास मनाई करण्यात येत आहे. उमेदवार नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात उमेदवारांसोबत दोन व्यक्ती यांच्या व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीस जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश दि.13 जानेवारी 2026 रोजी 00.01 वा. पासून ते दि.27 जानेवारी 2026 रोजीचे 24.00 वा. पर्यंत अंमलात राहील.या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जिद्दीपुढे आभाळ ठेंगणे' उरण च्या कोटगावची नीलम पाटील हिची आयसीटी मुंबईतून पीएचडी; जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनीची उत्तुंग भरारी

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** एका सामान्य कुटुंबातील मुलीने जर मनात जिद्द ठेवली तर ती जागतिक दर्जाच्या संस्थेतही आपले नाव करू शकते .हे उरण कोटगावच्या नीलम पाटील हिने सिद्ध करून दाखवले आहे. उरण मधील कोटगाव सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या नीलम ने देशातील रसायनशास्त्रातील सर्वोच्च संस्था असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी आय सी टी मुंबई येथून आपली पीएचडी पूर्ण केली आहे. एका जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनीचा हा प्रवास संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.

नीलम चा शैक्षणिक प्रवास अत्यंत खडतर आणि संघर्षाचा




राहिला आहे .तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद काळाधोंडा येथे इयत्ता १ली ते ७वी झाले आहे. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या निलमने एन आय हायस्कूल माध्यमिक आणि वीर वाजेकर ए एस सी कॉलेज फुंडे येथून ११वी १२ वीचे शिक्षण पूर्ण केले आहे.शिक्षणाची ओढ हि नीलमला फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर ए एस सी कॉलेज आणि त्यानंतर सिकेटी कॉलेज पनवेल येथे घेऊन गेली. तिथून तीने 'सेंद्रिय रसायनशास्त्र' विषयात एम एस सी पूर्ण केली त्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठीण मानली जाणारी सीईटी व पीईटी ही परीक्षा उत्तीर्ण होऊन तिच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तिला मुंबईतील जागतिक कीर्तीच्या आयसीटी संस्थेत संशोधनासाठी प्रवेश मिळाला आणि तिने तिथून रसायनशास्त्रातील पिएचडी मिळवून आपल्या नावापुढे 'डॉक्टर' ही पदवी लावली आहे.

निलमची सामान्य कुटुंबातील पार्श्वभूमी असली तरी नीलमने आपल्या मेहनतीच्या जोरावर परिस्थितीला कधीही यशाच्या आड येऊ दिले नाही .सामान्य घरातील मुलगी सुद्धा जर चिकाटीने प्रयत्न केले तर आयसीटी सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेतून पीएचडी मिळवू शकते .हे तीने आपल्या यशातून दाखवून दिले.जिल्हा परिषद शाळेची पाटी आणि खडू हातातून सुरू झालेला हा प्रवास आज मुंबईतील अत्याधुनिक प्रयोगशाळेपर्यंत पोहोचला आहे. नीलम पाटील हिने मिळवलेले हे यश केवळ तिचे वैयक्तिक या शासन उरण मधील अनेक ग्रामीण मुलींसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल उरण कोटगावाचे नाव तीने उंचावले आहे. सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिजाऊ जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुग्रा येथे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने डुग्रा येथील महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष तसेच राशन दुकानदार शिवाजीराव मोकाटे यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सेलू पोलीस स्टेशनचे एपीआय पवार साहेब यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टीचे उपजिल्हा अध्यक्ष शिवहरी शेवाळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे भागवत दळवे, ग्रामसेवक कर्डिले साहेब, कुंपणवार साहेब यांच्यासह गावातील ज्ञानेश्वर तारडे, दिलीप शिंदे, सोपान चाळक, धनंजय



थटोले, रमेश जाधव, नामदेव थटवले, सुभाष बरसाले, कैलास शिंदे, दत्ता परभणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात मान्यवरांनी जिजाऊ मासाहेबांच्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात आत्मसात करावा, असे आवाहन केले. शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक कृष्णा शिंदे सर यांनी केले. तर कार्यक्रमाचे आयोजक शिवाजीराव मोकाटे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षकवृंद व ग्रामस्थांचे आभार मानले.

# लासुर्णे पंचायत गणातून दादासो गायकवाड यांचे नाव राष्ट्रवादी कडून चर्चेत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती करिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून शुक्रवारी 16 जानेवारीपासून नामनिर्देशन अर्ज दाखल केले जाणार आहेत. त्यामुळे इच्छुक कार्यकर्त्यांनी उमेदवारीसाठी मोर्चे बांधणी सुरू केली आहे.लासुर्णे गणातून पंचायत समितीसाठी अनुसूचित मागास प्रवर्ग नागरिक आरक्षण असल्याने बेलवाडी येथील माजी सरपंच दादासो गायकवाड या इच्छुक असून ते कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे धडाडीचे व एकनिष्ठ कार्यकर्ता असल्याने राष्ट्रवादी कडून त्यांच्या नावाची चर्चा असल्याची माहिती मिळत आहे. त्याचप्रकारे लासुर्णे गणातील प्रत्येक गावात



भेटीगाठी सुद्धा चालू केल्या आहेत.श्री दादासो गायकवाड हे बेलवाडी ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य असून माजी सरपंच म्हणून सुद्धा त्यांनी उत्कृष्ट काम केल आहे अद्याप पर्यंत राष्ट्रवादी पक्षाने अधिकृतपणे उमेदवारांच्या नावांची घोषणा केली नसली तरी लासुर्णे पंचायत समिती गणासाठी बेलवाडी गावचे माजी सरपंच दादासो गायकवाड यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# वहाळच्या साई मंदिरात चंद्रकांत शिंदे यांनी रसिकांना जिंकले; महेंद्रशेठ घरत रमले प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणींत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी वहाळच्या साई मंदिरात आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत अन्नदान करतात. त्यानुसार गुरुवारी (ता.१५) त्यांनी अन्नदान केले. यावेळी मनोज तुलशीदास ठाकूर आणि प्रियांका मनोज ठाकूर यांच्या हस्ते साईबाबांचे मंगलस्नान करण्यात आले.

यावेळी 'स्वर प्रल्हादाचे' हा प्रल्हाद शिंदे यांच्या गीतांवर आधारित सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रल्हाद शिंदे यांचे चिरंजीव चंद्रकांत शिंदे यांनी प्रल्हाद शिंदे यांची गाजलेली गाणी सादर करून रसिकांना जिंकले. महेंद्रशेठ घरत यांनी या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारले होते. 'ऐका सत्य नारायणाची कथा, गेला हरी कुण्या गावा, चंद्रभागेच्या तीरी, पंढरपुरात काय वाजतगाजत, मंगळवेढे भूमी संतांची,

उड जायेगा पंछी, चढता सुरज, झूम बराबर झूम या' या एकापेक्षा एक गीतांनी आणि कव्वालीने चंद्रकांत शिंदे यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले आणि प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणी जाग्या केल्या. त्यामुळे रसिक भारावले होते. या कार्यक्रमाची आखणी श्रीकांत मुंबईकर यांनी केली होती.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "आम्ही लहानपणी प्रल्हाद शिंदे, गोविंद म्हशीलकर, रंजना शिंदे



आदींचे कव्वालीचे सामने ऐकायला रात्रीच्या वेळी पंचक्रोशीतील गावांत जायचो. जमिनीवर जागा मिळेल तिथे बसायचो. त्यावेळी त्यांची गाणी खूप आवडायची. त्यांचा मी चाहता आहे; परंतु त्यावेळी फार कमी पैसे बक्षीस म्हणून दिले जायचे. कारण चार आणे, आठ आण्याचा तो काळ होता; परंतु परमेश्वराने मला आता भरभरून दिले आहे. त्यामुळे मी आज चंद्रकांत शिंदेच्या दमदार आवाजाने पुन्हा त्या काळात गेलो आहे. प्रल्हाद शिंदेंचा तोच आवाज, तीच लकब, तशीच शेरोशायरी ऐकून मला निश्चितच खूप आनंद मिळाला आहे, असे म्हणत ते प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणींत रमले होते.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते चंद्रकांत शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आर्मी दिनानिमित्त रक्तदान केलेले माजी सैनिक नीलेश म्हात्रे यांचा सपत्नीक सन्मान गायन सम्राट चंद्रकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. महेंद्रशेठ घरत यांनीही रक्तदान केले. त्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.यावेळी साई मंदिर वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील, श्रीकांत घरत, रमेशशेठ घरत आणि एम. जी. ग्रुप, हजारो साईभक्त उपस्थित होते.

# पनवेलमधील घरफोडीचा गुन्हा उघड; एका आरोपीला अटक करून ७.२२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टपालनाका परिसरात झालेल्या मोठ्या घरफोडीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी कुर्ला, मुंबई येथून एका सराईत गुन्हेगाराला अटक केली असून त्याच्याकडून चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी 7 लाख 22 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



फिर्यादी प्रमोद जोरी (रा. सचिन प्लाझा बिल्डिंग, पांजरपोळ, टपालनाका, पनवेल) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातील 8,12,000 रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि 90,000 रुपये रोख रक्कम, असा एकूण 9,02,000 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी पोलीस उपनिरीक्षक पी.एस.आय. विनोद लभडे, पो. हवा. अविनाश गंथडे, पो. हवा. योगेश दिवेकर, पो. हवा. परेश म्हात्रे, पो. ना. सम्राट डाकी, पो. ना. विनोद देशमुख, पो. शि. किरण कराड आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, कमरुद्दिन सलाउद्दीन शेख (वय 45 वर्षे, रा. टॅक्सीमन कॉलनी, कुर्ला, मुंबई) याला ताब्यात घेतले असता तपास दरम्यान आरोपीकडून चोरीला गेलेल्या मालापैकी 7,22,000 रुपये (सात लाख बावीस हजार रुपये) किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# महेंद्रशेठ घरत हुतात्म्यांच्या चरणी नतमस्तक

## चिर्ले, धुतूम आणि जासई येथे हुतात्म्यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** १९८४ च्या गौरवशाली, शौरशाली आणि ऐतिहासिक लढ्याचे प्रणेते दि. बा. पाटील साहेब होते. या आंदोलनात पाच हुतात्मे झाले. त्यांना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी शुक्रवारी (ता. १६) अभिवादन केले. चिर्ले येथे हुतात्मा नामदेव शंकर घरत, तर धुतूम येथे रघुनाथ अर्जुन ठाकूर या हुतात्म्यांच्या चरणी ते नतमस्तक झाले. जासई येथे महात्मा ज्योतिबा फुले प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमात त्यांनी हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "हुतात्म्यांचे रक्त वाया जात नसते आणि जाऊ द्यायचे नसते, हे दिबांचे ब्रीदवाक्य आहे. भूमिपुत्रांनी हे विचार जगले पाहिजेत. हुतात्म्यांच्या बलिदानामुळे



आणि दिबांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आंदोलनामुळेच आणि असीम त्यागामुळेच प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या पदरी साडेबारा टक्के विकसित भूखंड पडले. आणि देशभर साडेबारा टक्के जमिनीचा कायदा लागू झाला. त्यामुळे हुतात्म्यांना अभिवादन करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. दिबांचे कार्य पुढे नेण्यासाठी मी सतत धडपड करीत आहे. त्यामुळे गावोगावी मैदान मिळाले च पाहिजे हे मिशन हाती घेतले आहे."

यावेळी हुतात्मा दिनी आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, दिबांचे पुत्र अतुल पाटील, अभय पाटील, डॉ. मनीष पाटील, कॉ. भूषण पाटील, जे. डी. तांडेल, धुतूमच्या सरपंच सुचिता ठाकूर आदी मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी जासई हायस्कूल, धुतूमच्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या हुतात्म्यांच्या बलिदानाच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे एनसीसी प्रमुख कॅ. रामदास जमनुके यांच्या एनसीसी कॅडेट चमुने हुतात्म्यांना सलामी दिली. दिबांचे पुत्र अतुल पाटील यांनी हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी आलेल्या सर्वांचे आभार मानले.

# श्री साई अबॅकस क्लास,पाटोदा यांचे दैदीप्यमान यश; नॅशनल लेव्हल स्पर्धेत १४ पैकी १४ विद्यार्थ्यांनी मिळवली टॉप रँक

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** जामखेड येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशन मध्ये श्री साई अबॅकस क्लास, पाटोदा येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत स्पर्धेत सहभागी झालेल्या १४ पैकी १४ विद्यार्थ्यांनी टॉप रँक मिळवून दैदीप्यमान कामगिरी केली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विद्यार्थ्यांची फक्त पाच मिनिटांची परीक्षा घेण्यात आली होती. अत्यंत कमी वेळेत विद्यार्थ्यांनी जलद व अचूक गणना, मानसिक गणित आणि उत्कृष्ट एकाग्रतेचे प्रभावी सादरीकरण केले. विशेषतः इयत्ता चौथीतील विभा अमोलकुमार सोनवणे हिने पाच मिनिटांत तब्बल १५१ गणिती उदाहरणे अचूक सोडवत



उल्लेखनीय कामगिरी केली. अबॅकस शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांची गणनागती, स्मरणशक्ती, एकाग्रता व आत्मविश्वास वाढत असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. लहान वयातच गणिताची भीती दूर होऊन विद्यार्थी आत्मविश्वासाने गणित हाताळत असल्याचे चित्र या स्पर्धेत दिसून आले. या यशाबद्दल आयोजित सन्मान कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, सिने अभिनेते बाळू वाळुंजकर, अ‍ॅड.महेश वारे, मा.प्रा. मधुकर राळेभात(माजी जिल्हा परिषद सदस्य), अमोल तातेड(जिल्हाध्यक्ष, भारतीय जैन संघटना, अहिल्यानगर), माननीय धनंजय भोसले(संचालक, मॅथ वर्ल्ड क्लासेस) तसेच श्रीमती सोनिया कौर(प्राचार्य) आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या उल्लेखनीय यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत व सातत्यपूर्ण सरावासोबतच श्री साई अबॅकस क्लासच्या शिक्षिका सौ.अर्चना पवार मॅडम यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या शिस्तबद्ध, प्रेरणादायी व विद्यार्थीकेंद्रित अध्यापनामुळेच विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश मिळवले असल्याचे पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या यशाबद्दल विद्यार्थी, पालक तसेच श्री साई अबॅकस क्लास, पाटोदा यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**पाच मिनिटांत अचूक सोडवलेली गणिते**

**(नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धा)**

विभा अमोलकुमार सोनवणे(इ.४थी)–१५१,वेदिका बबन पवार(इ.१ली)–१२५,प्रतिक्षा बाळासाहेब तांबे(इ.५वी)–११२,वैष्णवी सुनील तांबारे(इ.६वी)–११०,ऋतुजा ज्ञानेश्वर नेमाने(इ.७वी)–१०७,सिद्धी सुरेश शिंदे(इ.८वी)–१०२,शिवराज लक्ष्मण तांबे(इ.६वी)–१०२,समीक्षा पप्पू नेमाने(इ. 6 वी)–१०१,विराज विकास तांबे(इ.५वी)–१००,आलिया ईनुस शेख(इ.७वी)–९९,चारू बबन पवार(इ.५वी)–९८,यशराज बाळू तांबे(इ.४थी)–९७,अविराज गोकुळ तांबे(इ.४थी)–९७,श्रेयश संतोष तांबे (इ.६ वी)–९६

**अबॅकस म्हणजे काय?**

अबॅकस ही मेंदूच्या दोन्ही बाजूंचा विकास करणारी आधुनिक गणित शिक्षणपद्धती आहे. या मुळे विद्यार्थ्यांची गणनागती, स्मरणशक्ती, एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो. अबॅकसच्या नियमित सरावामुळे विद्यार्थी मानसिक गणित अतिशय कमी वेळेत व अचूक सोडवू शकतात. लहान वयातच गणिताची भीती दूर होऊन शालेय अभ्यासात लक्षणीय प्रगती दिसून येते.

# राष्ट्र सेविका समिती रायगड जिल्ह्याचे पनवेल येथे सघोष पथसंचलन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** समरस, सुखमय व सुसंघटित समाजनिर्मितीसाठी ‘राष्ट्र सर्वोपरी’ हे बीज प्रत्येक कुटुंबात रुजणे आवश्यक आहे. यासाठी सक्षम मातृशक्तीचे संघटन करण्याचे कार्य गेली नऊ दशके राष्ट्र सेविका समिती सातत्याने करत आहे. या कार्याचेच प्रत्यक्ष दर्शन घडवणारा उपक्रम म्हणजे सघोष पथसंचलन असून राष्ट्र सेविका समिती रायगड जिल्हा यांच्या वतीने रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी पनवेल शहरात सघोष पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

संचलनाची सुरुवात सायंकाळी ४. ३० वाजता गुजराती शाळा, पनवेल येथून होणार आहे.हे पथसंचलन गुजराती शाळा येथून निघून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे डावीकडे वळून विसावा हॉटेल, ज्योती आहार भवन, कायस्थ हॉल, विरुपाक्ष मंदिर येथून पुढे जात कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा येथे वळेल. त्यानंतर क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृह, शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा गुजराती शाळा येथे संचलनाची सांगता होईल.या सघोष पथसंचलनाच्या स्वागतासाठी तसेच ध्वजावर पुष्पवृष्टी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्र सेविका समिती, रायगड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# मकरसंक्राती स्पेशल हळदी कुंकू समारंभात संविधान जागृती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** भिडेवाडाकार फुलेप्रेमी संविधान दूत विजय वडवेराव आयोजित संविधान जागर अभियानांतर्गत मकर संक्रांती स्पेशल हळदी कुंकू समारंभात संविधान घ्या संविधान द्या हा उपक्रम संविधान दूत दुर्गा देशमाने राऊत यांनी शाहूनगर माजलगाव बीड येथे अतिशय उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात घेतला. यावेळी दुर्गा देशमाने राऊत यांनी हळदी कुंकू समारंभासाठी जमेल्या स्त्रियांना संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्या विषयी सहज सोपे मार्गदर्शन केले. या उपक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

भारतीय संविधाना विषयी सामान्य माणसात जनजागृती व्हावी, प्रचार प्रसार व्हावा यासाठी आणि भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना बहाल केलेले हक्क व कर्तव्ये कष्टकरी, मजूर, कामगार, शेतकरी, वंचित, दुर्बल, शोषित, पिडीत अशा समाजाच्या तळागाळातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावेत, त्यांना जाणीव करुन द्यावी व त्यांच्यात जागृती



व्हावी, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात स्त्रियांना दिलेल्या विशेष सोयी,सुविधा, हक्क स्त्रियांना कळावेत यासाठी हळदी कुंकू समारंभात तीळ गुळ घ्या गोड गोड बोला म्हणतानाच संविधान घ्या संविधान द्या म्हणजे संविधाधानातील विचारांचे वाण घ्या आणि द्या असा खास उपक्रम संविधान दूत विजय वडवेराव यांच्या मार्गदर्शनात देशभरातील अनेक राज्यात आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

सर्व सामान्य नागरिकांत संविधान व संविधान निर्मात्या विषयी प्रेम आपुलकी व आदरभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

# खराब रस्त्यामुळे वाहन धारकांना प्रवास करताना करावी लागते तारेवरची कसरत

**दैनिक युवक आधार**

**जाफ्राबाद तालुका प्रतिनिधी/ अशोक म्हस्के :** जाफराबाद तालुक्यातील ब्रम्हपुरी व हनुमंतखेडा येथील नागरिकांना जाफ्राबाद हे तालुक्याच्या ठिकाण असल्यामुळे त्यांना दररोज कामानिमित्त किंवा आजारी पेशंटला दवाखान्यात नेण्यासाठी जावे लागते. परंतु ब्रम्हपुरी ते डोलखेडा बु. फाट्यापर्यंत हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. खडकपूर्णा प्रकल्पाचे या भागात बॅक वॉटर असल्यामुळे या भागात ओलिताचे क्षेत्र आहे. त्यामुळे या भागात उसाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या भागातील उस कारखान्यास पाठवण्यास सुरुवात झालेली आहे. या भागात ऊस तोडणी मजूर सुद्धा खराब रस्त्यामुळे येण्यास टाळाटाळ करत आहे, खराब रस्त्यामुळे ऊस वाहतूक करणारे ड्रायव्हर सुद्धा ऊस वाहतूक करण्यास टाळाटाळ करत आहे . ऊस लागवड केलेले शेतकरी या लोकांना शिल्लक चे पैसे देऊन आपल्या शेतातील ऊस तोडण्यास,वाहतूक करण्यास भाग पाडत आहे त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत आहे. उसाचे पीक हे बारा महिने असल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न हे बारा महिन्यानंतरच मिळते त्यामुळे शेतकरी फार हलाखीची परिस्थिती मध्ये जगत आहे. या खराब रस्त्यामुळे इमर्जन्सी पेशंट नेण्यास विलंब होत असल्यामुळे पेशंट दगावण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात संभवत आहे . अशा अनेक प्रकारच्या समस्या खराब रस्त्यामुळे झालेल्या आहे. ब्रह्म पुरी येथील शेतकरी व नागरिकानी दिलेल्या माहितीनुसार ब्रह्मपुरी ते डोलखेडा बुद्रुक फाट्यापर्यंत ह्या रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी मंजूर होऊन चालू झालेले होते. संबधित ठेकेदाराने



या रस्त्यावर गिट्टीचे जागोजागी ढीग सुद्धा टाकलेले होते. तरीसुद्धा चांगला रस्ता झालेला नाही. रस्ता न होण्याचे कारण ब्रह्मपुरी येथील नागरिकांकडून काही समजू शकले नाही. ब्रम्हपुरी व हनुमंतखेडा ते डोलखेडा फाट्यापर्यंत या रस्त्याने रात्रीचे वाळूचे टिप्पर जातात त्यामुळे सुद्धा हा रस्ता आणखी मोठ्या प्रमाणात खराब झालेला आहे. असे ब्रह्मपुरी येथील शेतकरी व नागरिकाचे म्हणणे आहे. जाफराबाद ही मोठी बाजारपेठ असल्यामुळे जाफराबाद ला जाण्यासाठी हा मुख्य रस्ता आहे, जाफराबाद ला जाण्यासाठी पर्याय दुसरा रस्ता नसल्यामुळे नागरिकांना नाईलाजाने या रस्त्याने आपल्या जीवाची पर्वा न करता प्रवास करावा लागतो. या भागातील पुढारी व कार्यकर्ते या रस्त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहे. असे ब्रम्हपुरी येथील नागरिकाचे म्हणणे आहे.ऊस तोडणी होईपर्यंत तरी ब्रह्मपुरी ते डोलखेडा बुद्रुक फाट्यापर्यंत अवैध वाहतूक थांबवण्यात यावी असे ब्रम्हपुरी शेतकरी रामेश्वर जाधव, पांडुरंग शेवत्रे, रामदास शेवत्रे शेतकरी संघटनेचे जाफराबाद, श्रीराम शेवत्रे,संजय शेळके, बाबुराव नानगुडे सुनील जाधव,सुधाकर शेवत्रे यांनी मागणी आहे.

# मतदारांचा आशीर्वाद भाजपलाच; दयाशंकर तिवारी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी अत्यंत विस्कळीत आणि दोषपूर्ण होती. एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या प्रभागांमध्ये विभागली गेल्याने मतदारांना मोठा त्रास सहन करावा लागला, मात्र अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बूथ स्तरावर प्रामाणिकपणे काम करून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. निवडणूक आयोगाच्या तांत्रिक चुकांमुळे मतदारांमध्ये संभ्रम असताना भाजपच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मतदारांना योग्य मार्गदर्शन व मदत केली,त्यांच्या या अहोरात्र मेहनतीबद्दल सर्व कार्यकर्त्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.लोकशाहीच्या या महापर्वात ज्या मतदारांनी पूर्ण ताकतीने सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावला,त्यांचे विशेष रूपाने अभिनंदन. नागपूरकर जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद नेहमीच भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी राहिले आहेत आणि याही वेळी मतदारांच्या याच आशीर्वादामुळे नागपूर महानगरपालिकेत पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीचे पूर्ण बहुमताचे सरकार येईल,असा पूर्ण विश्वास आहे.संपूर्ण नगरवासीयांनी या लोकशाहीच्या उत्सवात जे सहकार्य केले,त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानून हार्दिक अभिनंदन करतो.

**दयाशंकर तिवारी**
**अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगर**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# करुणा क्लब द्वारे वृद्धाश्रमाला भेट आणि साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**

**वडनेर/वार्ताहर :** नी. मु. घटवाई विद्यालय ,कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील *करुणा क्लबद्वारे* हिंगणघाट येथील वृद्धाश्रमाला भेट देण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी करुणा क्लब च्या सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या उपक्रमामध्ये आपल्याजवळील पैसाच्या स्वरूपात वर्गणी गोळा करून हिंगणघाट येथील आश्रय शहरी बेघर निवारा या वृद्धाश्रमाला भेट देऊन अन्नधान्य व काही दैनंदिन वापरातील वस्तू आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये आपल्या लोक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बाबूजी डागा हे अध्यक्ष म्हणून तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून लोक शिक्षण मंडळाचे सचिव रोशन बाबूजी डागा तसेच प्राचार्य श्री.गोडे सर तसेच वृद्धाश्रम व्यवस्थापक श्री. दिनेशभाऊ वर्मा त्या सोबतच श्री मोहन भाऊ इसरानीजी, डॉ.बुलनीजी ,श्री.शर्माजी उपस्थित होते.

करुणा क्लब तर्फे श्री.राजेंद्र बाबूजी यांच्या हस्ते साहित्याचे भेट दिनेशभाऊ वर्मा यांच्या स्वाधीन करण्यात आले. बाबूजींनी आपल्या अध्यक्ष भाषणात आजच्या या परीस्थितीवर मात करण्यासाठी उत्तम संस्कार महत्वाचे आहे जे आपण शिक्षक या



नात्याने विद्यार्थ्यांवर घडवावे तसेच आपण आपल्या या उपक्रमातून नेहमीच मदत करू याची ग्वाही दिली.तसेच श्री वर्माजींनी वृद्धाश्रमाच्या जडणघडनेची माहिती दिली. प्राचार्य श्री.रवींद्र गोडे सर यांनी करुणा क्लब च्या उपक्रमाची सविस्तर माहिती मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुणा क्लब प्रमुख श्री.वडमलवार सर यांनी केले.तसेच त्यांचे सहकारी श्री.धोंगडे सर यांनी आज पावेतो करुणा क्लब द्वारे केलेल्या कार्याची माहिती दिली. सदर कार्यक्रमाला उपप्रचार्या सौ.बोंडे मॅडम, करुणा क्लब सदस्य पर्यवेक्षिका सौ.मनीषा राठोड मॅडम तसेच सौ.शेख मॅडम, सौ.राजूरकर मॅडम, सौ. वाठ मॅडम, श्री.तेलरांधे सर, श्री.तळवेकर सर, श्री. चौधरी सर उपस्थित होते. सर्व शिक्षक शिक्षिका व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# महावितरणच्या 'घोटीटोक' आणि 'वडंबा' उपकेंद्रांना मानाचा 'आयएसओ' बहुमान

## दुर्गम भागातील ७२ गावांना मिळणार दर्जेदार वीजपुरवठा; कर्मचाऱ्यांच्या सांघिक परिश्रमाचे फळ

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंडित वीज सेवा देण्यासाठी उपकेंद्रांचे सक्षमीकरण करणाऱ्या महावितरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नागपूर ग्रामीण मंडळांतर्गत येणाऱ्या घोटीटोक आणि वडंबा या 33/11 केव्ही विद्युत उपकेंद्रांना जागतिक स्तरावरील 'आयएसओ 9001:2015 हे मानांकन प्राप्त झाले आहे.

दुर्गम आणि आदिवासी बहुल भागातील 72 गावांना या उपकेंद्रांमार्फत वीज पुरवठा केला जातो. महावितरणच्या ध्येय-धोरणांनुसार, या दोन्ही उपकेंद्रांमधील सर्व उपकरणांची आणि प्रणालींची व्यापक चाचणी घेऊन त्यांचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने 24x7 अखंडित वीज वितरण. उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांची देखभाल आणि वितरण



आयएसओ मानांकन प्राप्त महावितरणचे घोटीटोक आणि वडंबा येथील 33/11 केव्ही उपकेंद्र.

रोहित्र (ट्रांसफॉर्मर) व ग्राहक सेवांचे कार्यक्षम संचालन या सेवांच्या उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी हे मानांकन देण्यात आले आहे.

महावितरणच्या 'इज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेनुसार ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी वीज हा कणा आहे. आयएसओ मानकांमुळे या भागातील ग्राहकांना आता अधिक दर्जेदार आणि तांत्रिक बिघाडमुक्त सेवा मिळण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे, उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या बदलांमुळेच हे यश शक्य झाले आहे. हे मानांकन म्हणजे कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा विजय आहे. अशाच प्रकारची प्रेरणा घेऊन इतर विभागांनीही उत्कृष्ट कामाचे दर्शन घडवावे, असे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे व मौदा विभागाचे कार्यकारी अभियंता अजय कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश संपादन करण्यात आले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनील पांडे, उपकार्यकारी अभियंता प्रफुल्ल वैद्य, सहाय्यक अभियंता नीलेश चामट व गिरीश मदाम यांच्यासह सर्व तांत्रिक कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेत अथक परिश्रम घेतले.

# तावशी येथील सौ.तेजस्विनी खरात सणसर-लासुर्णे जिल्हा परिषदसाठी तयारी सुरु

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन उमेदवारीची केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटातून तावशी (ता.इंदापूर) गावचे सामाजिक कार्याची आवड असणारे व जनतेच्या कामाविषयी तळमळ करणारे तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणेमामा यांचे सक्रिय कार्यकर्ते मा.विनायक तुळशीदास खरात यांच्या पत्नी सौ.तेजस्विनी विनायक खरात या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असून त्यांची तयारी चालू झाली असल्याचे दिसत आहे

मा विनायक खरात यांनी अत्यतं प्रतिकूल परिश्रमातून शिक्षण घेऊन स्वतःची बांधकाम व्यवसाय कंपनी उभा केलेली आहेत तावशी गावात





श्री गोवंश डेअरी फार्मच्या माध्यमातून लोकांसोबत जनसंपर्क वाढण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. विनायक कन्स्ट्रक्शन कंपनी असून,ते बांधकाम व्यवसायामध्ये गेली १५ वर्षे पुणे व परिसरामध्ये कार्यरत आहे.सध्या इंडस्ट्रीयल शेडमध्ये व्यवसाय जोरात चालू आहे.साधारण २५० पेक्षा जास्त लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

श्री काळभैरवनाथ क्रीडा मंडळाच्या अध्यक्ष या नात्याने गावात राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. जिल्हा परिषद गटामध्ये अनुसूचित जाती महिलेचे आरक्षण जाहीर झाल्यामुळे श्री. विनायक खरात त्यांच्या पत्नी तेजस्विनी विनायक खरात यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून उमेदवारी मिळावी,अशी त्यांची इच्छा आहे.खरात यांनी स्वखर्चातून सुमारे सात लाख रुपयांचा जलशुद्धीकरण प्लांट गावामध्ये बसून दिला व वाड्या-वस्त्यांवरील आई-बहिनींच्या डोक्यावरील हांडे उतरवले तसेच गावातील एका वस्ती मध्ये पाण्याची व्यवस्था नसताना तिथे बोर मारून व पाण्याची टाकी बांधून दारोदारी नळ कनेक्शन देऊन पाण्याची सोय केली गावातील जवळपास दहा गरिब कुटुंबासाठी घर बांधून दिली.गावातील प्रत्येकाच्या अडचणीत मदत करण्याचा प्रयत्न केला आणि आता इथून पुढे फक्त समाजासाठी काम करून समाधानी राहणार असल्याच सांगण्यात आलं.

# मुंबईत महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** अत्यंत प्रतिष्ठेची निवडणुक ठरलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप शिवसेना रिपाइं महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज वर्षा बंगल्यावर भेट घेवून हार्दिक अभिनंदन केले. राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालीकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रात सर्व महापालिकांमध्ये

महायुतीच्या महाविजयाचे शिल्पकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरल्याचे सांगत ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे.मुंबई महापालिकेची निवडणुक ठाकरे बंधूंनी प्रतिष्ठेची निवडणुक केली होती. गेली २५ वर्षे उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे मुंबई महापालीकेवर राज्य होते. मराठी भाषेचा भावनिक मुद्दा



उपस्थित करुन उध्दव आणि राज या दोन बंधुनी मुंबई पालिकेची निवडणुक चुरशीची केली होती. या निवडणुकीच्या निकालाबाबत आपण आधीच सांगितले होते की, मुंबईत मराठी जनता ही भावनिक राजकारणाला भुलणार नाही. विकासाच्या मुद्द्यांना मराठी जनता महत्व देईल. मराठी भाषिक जनतेने आणि मुंबईतील गैरमराठी जनतेने महायुतीला भरभरुन मतदान केले आहे. त्यामुळे महायुतीचा महाविजय झालेला आहे. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना अनेक वर्ष मुंबई महापालिकेवर राज्य करु शकली ते केवळ भाजपच्या पाठिंब्यामुळे! २०१२ सालापासुन रिपब्लिकन पक्षाने शिवसेनेला शिवशक्ती -भिमशक्तीच्या माध्यमातुन पाठिंबा दिला होता. मात्र आता भाजप रिपाइं ठाकरे सेने सोबत नसल्यामुळे शिवसेनेचा दारुण पराभव झालेला आहे. राज ठाकरे यांच्या युतीमुळे उध्दव ठाकरेंचा फायदा होणार नाही; हे मी या आधीच सांगितले होते असे ना. रामदास आठवले म्हणाले.राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालिकेत महायुतीचा महाविजय होणार असल्याचा आपला अंदाज खरा ठरला असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वामुळे राज्यभरातील २९ महापालिकांमध्ये महायुतीने चांगली कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मुंबईत महायुतीचा महाविजय झाला असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले. महायुतीला महाविजय दिल्याबद्दल मुंबईकरांचे आणि राज्यातील जनतेचे ना. रामदास आठवले यांनी आभार मानले आहे. आंबेडकरी जनतेने आपला कौल महायुतीला दिल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी आंबेडकरी जनतेचेही आभार मानले आहेत.

# जनजागृती हाच सिकलसेलमुक्त भविष्यासाठी खरा पाया- जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## अरुणोदय – सिकलसेलमुक्त भविष्यासाठी' या विशेष अभियानाचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह ठाकुर :**

वाशिम, (जिमाका) : सिकलसेल हा आजार केवळ वैद्यकीय प्रश्न नसून तो सामाजिक जाणीवेशीही निगडित आहे. योग्य माहिती, वेळेवर तपासणी आणि समाजाची सक्रिय भागीदारी यामुळेच सिकलसेलमुक्त पिढी घडवता येईल. यासाठी जनजागृती हाच सिकलसेलमुक्त भविष्यासाठी खरा गाभा आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या 'अरुणोदय – सिकलसेलमुक्त भविष्यासाठी' या विशेष अभियानाच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात विविध स्तरांवर व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत तपासणी शिबिरे, मार्गदर्शन सत्रे व समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल



कावरखे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे, बाह्यसंपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. पराग राठोड, बालरोग तज्ज्ञ डॉ. बगाडे, , तसेच बाकलीवाल महाविद्यालय येथील एनसीसी अधिकारी अमोल काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'अरुणोदय... सिकलसेलमुक्त भविष्यासाठी' या विशेष अभियानाचा वाशिम जिल्ह्यात आज जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते औपचारिक शुभारंभ झाला. हा कार्यक्रम जिल्हा रुग्णालय वाशिम येथील डी.ई.आय.सी. विभागात पार पडला.

जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे बोलतांना सांगितले की, सिकलसेल हा आजार संसर्गजन्य नसून अनुवांशिक आहे. सिकलसेल वाहक अथवा रुग्णाने सिकलसेल वाहक किंवा रुग्णाशी विवाह केल्यास पुढील पिढीत या आजाराचा प्रसार होण्याची शक्यता अधिक असते. मात्र सिकलसेल वाहक अथवा रुग्णाने सामान्य व्यक्तीशी विवाह केल्यास पुढील पिढीत सिकलसेल होण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे लग्नपत्रिका जुळवण्यापूर्वी सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. पी. एस. ठोंबरे यांनी मांडली. प्रस्तावनेत त्यांनी माहिती देताना सांगितले की, वाशिम जिल्ह्यात सद्यस्थितीत सिकलसेलचे १७३ रुग्ण असून २,११७ सिकलसेल वाहक आहेत. त्यामुळे सिकलसेल प्रतिबंधासाठी जनजागृती व तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे.

या अभियानाअंतर्गत आरोग्य विभागामार्फत घरोघरी जाऊन सिकलसेल तपासणी, निदान, उपचार, समुपदेशन तसेच व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. सिकलसेल आजार आढळून आल्यास घाबरून न जाता जवळच्या शासकीय आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

कार्यक्रमाचा समारोप डॉ. विजय काळे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन सिकलसेलमुक्त व निरोगी समाजनिर्मितीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. अधिक माहितीसाठी टोल-फ्री क्रमांक १०४ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कृषी विज्ञान केंद्राद्वारे अन्न प्रक्रिया उद्योगासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेअंतर्गत क्षमता बांधणी व अन्न प्रक्रिया उद्योग या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक 7 ते 9 जानेवारी 2026 दरम्यान विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक, युवक, महिला व शेतकऱ्यांना तांत्रिक, व्यावसायिक तसेच उद्योजकता विकास विषयक सखोल व शास्त्रीय मार्गदर्शन देणे हा होता. या कार्यक्रमात हीना शेख, उपसंचालक कृषी विभाग, वाशिम तसेच जिल्हा नोडल अधिकारी, यांनी योजनेची उद्दिष्टे, लाभार्थी निवड प्रक्रिया, अनुदान व कर्ज संलग्नता तसेच शासकीय सहकार्याच्या विविध बाबींची सविस्तर व वस्तुनिष्ठ माहिती दिली. डॉ. सुधीर देशमुख,



प्रशिक्षण जिल्हा नोडल अधिकारी व ईडीपी प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया उद्योगातील उदयोन्मुख व्यवसाय संधी, शेतीमालाचे मूल्यवर्धन, बाजारपेठ व्यवस्थापन, विपणन धोरणे तसेच उद्योजकतेच्या विविध शास्त्रीय पैलूंवर मार्गदर्शन केले. यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की योजना ही ग्रामीण भागातील युवक, महिला व शेतकऱ्यांसाठी शाश्वत स्वयंरोजगार निर्मितीची प्रभावी संधी असून अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतीमालाला योग्य दर, गुणवत्तापूर्ण मूल्यवर्धन व व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. कृषी विज्ञान केंद्रामार्फत तांत्रिक प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, उद्योजकता मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शुभांगी वाटाणे, प्रमुख, गृहविज्ञान व जिल्हा प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण अन्न सुरक्षा मानके, पॅकेजिंग, ब्रँडिंग तसेच महिलांसाठी उपलब्ध व्यवसाय संधी यावर सखोल व तांत्रिक माहिती दिली.

तसेच अर्चना कदम, ईडीपी प्रशिक्षक यांनी उद्योग व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, खर्च-उत्पन्न विश्लेषण व यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक कौशल्य विकासावर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाच्या अंतिम दिवशी सहभागी लाभार्थ्यांसाठी मंगरूळपीर तालुक्यातील मौजे मानोली येथील योजनेचे लाभार्थी श्री. विशाल माहुलकर यांच्या 'व्यंकटेश ऑईल मिल' या युनिटला प्रत्यक्ष भेट आयोजित करण्यात आली.

# हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण

'हिंद दी चादर',श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभीमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख...

कश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. 'ना पेह देना ! ना पेह सेना' म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) कश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली.दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना 'हिंद दी चादर'म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे. याच ठिकाणी गुरु तेगबहादुरांनी तत्कालीन सत्तेला आपल्या प्राणांच्या आहुतीतून भारतीयांच्या एकीचा व सद्भावनेचा संदेश दिला. २५ मे १६७५ रोजी सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेनुसार गुरु तेगबहादुरांचे शिर अमानुषपणे धडापासून वेगळे करण्यात आले आणि 'जो कोणी तेगबहादुरांचे उत्तर कार्य पार पाडेल त्याला व त्याच्या कुटुंबीयांना कठोर शिक्षा करण्यात येईल,' असा फतवा काढला.

अशा दहशतीच्या वातावरणामध्ये ढवळून निघालेले भारतीय मन नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी धडपडू लागले. सत्तेची अवाज्ञा करून भाई जेतासिंह यांनी त्यांचे 'शिर'आनंदसाहेब दरबार येथे शिखांचे दहावे गुरू आणि गुरू तेगबहादुरांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांच्या सुपूर्द केले. इकडे भाई लखीशाह बंजारा यांनी मुलगा नाथईय्याजी यांच्या मदतीने गुरू तेगबहादुरांचे 'धड' दिल्लीतीलच रकाबगंज गावात आणले व आपल्या राहत्या घरात ते ठेवून घरालाच अग्नी दिला. त्यानंतर त्याच ठिकाणी पवित्र अस्थी जमिनीत पुरल्या आज तिथेच 'रकाबगंज गुरुद्वारा'उभा आहे.

**त्याग व शौर्याचे प्रतीक 'सीसगंज' आणि 'रकाबगंज' गुरुद्वारा**

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरूद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरूद्वारा भारतीयांचे मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे, तर संसद भवनाच्या मागील भागात




रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे.शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्युनंतर बकाला येथे जाऊन विरक्त वृत्तीने राहू लागले.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह यांचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

तेगबहादुर यांच्या कुटुंबातील सात सदस्यांचे बलिदान

देशहितासाठी प्राणांचे बलिदान देणारे गुरु तेग बहादुर यांनी मोठा आदर्श घालून दिला. त्यांचीच शिकवण पुढे घेऊन जात त्यांच्या कुटुंबीयांनीही बलिदान दिले. आनंदपूरच्या लढायांनंतर सरदार वजीर खानाने गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला.यात मोठे दोन साहिबजादे अजीतसिंग आणि जुझारसिंग यांनी सरदाराच्या सैन्यासमोर शौर्याने लढत वीरगती प्राप्त केली. छोटे साहिबजादे जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांना त्यांच्या आजी माता गुजरीजींसोबत सरहिंदच्या थडग्यात कैद करण्यात आले. वजीर खानाने त्यांना थंडीच्या रात्री उघड्यावर ठेवले आणि नंतर जिवंतपणे भिंतीत बंद करून मारले. या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने २१ ते २७ डिसेंबर हा 'बलिदान सप्ताह' आणि २६ डिसेंबर हा 'वीर बाल दिवस' म्हणून घोषित केला व देशभर तो साजरा केला जात आहे. शिखांचे दहावे व शेवटचे गुरु, गुरु गोविंद सिंग यांनी १४ युद्धे लढली. १७०८ मध्ये नांदेड येथे देश रक्षणासाठी लढताना ते शहीद झाले.

गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या सद्विचारांचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये 'शबद' (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये 'श्लोक' आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठया प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. विदर्भ आणि छत्तीसगढ मधील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मीकी आणि सिंधी समाजबांधवानी एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा केला.

श्री हुजूर साहिब नांदेड शीखांचे दहावे गुरू श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, 'सब सिक्खन को हुकम हे गुरू मान्यो ग्रंथ साहिब' असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारीला शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

नांदेडमध्ये देहरुपी गुरु जाऊन गुरुग्रंथ साहिबची स्थापना झाली. नांदेड येथील बंदासिंग यांनी गुरु गोविंद सिंग यांच्या प्रेरणेने पंजाबात जाऊन परकियांशी लढा दिला व प्रशासक बनले. त्यांनी सरहिंद जिंकून शेतकऱ्यांना जमीन मालकीचा अधिकार दिला आणि स्वराज्याची पायाभरणी केली.गुरू गोविंद सिंग यांनी १७०६ मध्ये 'जफरनामा' हे पत्र लिहून सत्ता प्रमुखाला नैतिकतेचे आव्हान दिले. हे पत्र फारसी भाषेत असून, त्यात सत्ताधिशांच्या विश्वासघातकी वर्तनाचा, जुलूमांचा आणि शीखांवर केलेल्या अत्याचारांचा समाचार घेतला. पत्र वाचून बादशाहने गुरूजींना सन्मानाने आणण्याचा आदेश दिला, पण गुरूजींनी ते नाकारले. हे पत्र शीख इतिहासातील विजयाचे प्रतीक मानले जाते.

मराठवाडयातील नरसी नामदेव हे थोर वारकरी संत, संत नामदेवांचे जन्म गावही याच भागात आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या विस्ताराकरिता देशभ्रमण केले. पंजाबात गेले असता त्यांच्या उद्बोधनाने सर्व समाज भारावला त्यांच्या ६१ अभंगांचा शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहिबमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा देशरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मिकी उदासीन आणि गुरुनानक नामदेव संगत, तखत नांदेड गुरुसाहेब यांचा समावेश असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना आणि मराठवाडयातील शीख व अन्य समाज बांधव मोठया संख्येने यात सहभागी होणार आहेत. गुरु तेगबहादुरांच्या कार्याची महिती पोचविण्यासाठी प्रत्येक शाळा,महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, गीते, डाक्युमेंटरी प्रदर्शीत करण्यात येत आहेत.

या सर्व आयोजनातून 'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे महान विचार आणि अजोड कर्तृत्वाचा परिचय जनतेला होणार आहे.

## स्वीकृत नगरसेवक पदी पेण नगरपरिषदेवर भाजपा युवा मोर्चाच्या अध्यक्षांचा समावेश युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जलाराम मेडिकल स्टोअर्स पेण चे संचालक तसेच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे लोकप्रिय अध्यक्ष श्री.मितेश जवाहर शहा यांची पेण तालुका नगरपरिषदेवर स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली आहे. मितेश शहा या यशाचे श्रेय देताना कार्यसम्राट आमदार आणि कॅबिनेट मंत्री असणाऱ्या रवीशेठ पाटील तसेच खासदार धैर्यशील पाटील यांच्या आशीर्वादाने माझ्या कार्याचा गौरव झाला तसेच नगराध्यक्ष श्री. प्रीतम पाटील गटनेते श्री. अनिरुद्ध पाटील आणि युवा नेते श्री. ललित रवींद्र पाटील यांच्या अत्यंत मोलाच्या



सहकार्यामुळे हे यश मिळाल्याचे मितेश शहा सांगतात. पुढील वाटचाल करीत असताना पेण शहरातील जनतेच्या अडीअडचणी आणि विकास कामे याच्यासाठी या नगरसेवक पदाचा उपयोग करेन.

रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोशियन तर्फे सर्वच तालुक्यातून तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून श्री. मितेश शहा यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे .

## पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 प्रमाणे मनाई आदेश जारी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** राज्य निवडणूक आयोगाने 13 जानेवारी 2026 रोजीचे अधिसुचनेनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक सन-2026 करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये 16 जानेवारीपासून 21 जानेवारी रोजी पर्यत निवडणुक कार्यक्रमांनुसार उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे. तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा 27 जानेवारी आहे. त्याअनुषंगाने, विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे.त्याकरिता पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मि नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पनवेल पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये तहसिलदार कार्यालय, जुना ठाणा नाका रोड, साईनगर, पनवेल व उरण पंचायत समिती कार्यक्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्त सिडको प्रशिक्षण केंद्र, सेक्टर नं. 30, बोकडविरा, उरण यांच्या कार्यालयाचे 100 मीटर परिक्षेत्रात बंदी आदेश जारी केला आहे.नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना उमेदवारांना फक्त दोन वाहने घेवून जाता येतील. कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास, कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे. ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.. कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर चिटकवण्यास मनाई करण्यात येत आहे. उमेदवार नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात उमेदवारांसोबत दोन व्यक्ती यांच्या व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीस जाण्यास मनाई करण्यात येत आहे.हा आदेश 13 जानेवारीपासून ते 27 जानेवारी पर्यंत अंमलात राहील. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

## शिवभक्त प्रथमेश पुंडे यांच्या कार्याचे महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री आ. मकरंद आबा पाटील यांनी केले कौतुक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महाराष्ट्र राज्य मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

छत्रपतींचा इतिहास जनसामान्य लोकांमध्ये पोहचविण्यासाठी प्रथमेश भास्कर पुंडे यांची किल्ले प्रतापगड दर्शन मोहिम उत्साहात राबविली. यावेळी जयघोषाने प्रतापगड दुमदुमला. 140 पेक्षा जास्त शिवभक्तांनी सर केला प्रतापगड किल्ला. नवी मुंबई येथील लहान मूल,महिला,पुरुष यांनी घेतले प्रतापगडाचे दर्शन. आमच्या राजाचे पराक्रम,आयुष्य,वीरांचे बलिदान याच गडकिल्ल्यांनी बघितले आहेत.गडकिल्ले हेच खरे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक. माझे अस्तित्व छत्रपती शिवाजी महाराज आणि आमच्या पूर्वजांनी दिलेल्या बलिदानामुळे आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वकालीन सर्वश्रेष्ठ राज्यकर्ते होते. शिवाजी महाराजांचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्म परायणतेचे होते. राज्यकर्ते म्हणून ते सर्वश्रेष्ठ तर होतेच ; पण त्याचबरोबर ते व्यक्ती म्हणून सुद्धा आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठच आहेत.

शिवरायांच्या ठायी शौर्य, पराक्रम, युक्तिमत्ता, साहस, स्वाभिमान, उद्यमशीलता, निःपक्षपातीपणा, कुशलता, विवेकशीलता, गुणग्राहकता, निर्णयक्षम, कल्पकता असे विविध गुण, जीवनमूल्ये आणि जीवन कौशल्ये होती. चारित्र्याची उत्तम जडणघडण होण्यासाठी मानवाला या महत्त्वपूर्ण जीवनकौशल्यांची आवश्यकता आहे. स्वराज्यावर अफजलखानाच्या रूपाने मोठे संकट आले तेव्हा जिजामाता म्हणतात, "शिवबा या मातेने आपला पुत्र गमावला तरी बेहत्तर पण स्वाभिमानाने लढा.'' आज या प्रकाराची पिढी आणि आई वडील मुलांना या राष्ट्राच्या कल्याणासाठी,राष्ट्र रक्षणासाठी समाजासाठी तयार करतील तरच भविष्य असेल असे मला वाटते. स्वराज्यातील गडकिल्ले हे पराक्रमाची,संघर्षाची प्रतिके आणि ऊर्जास्रोत आहेत.युनेस्कोच्या यादीतील किल्ल्यांच्या भेटीतील 4 मोहिमेतील किल्ले प्रतापगड आहे अशी माहिती प्रथमेश भास्कर पुंडे यांनी दिली.

महाराजांचे विचार जनसामान्यांत रुजावे यातून राष्ट्रप्रथम पिढी उभी रहावी हेच प्रमुख उदिष्ट. मराठी शाहीर वैभव घरत आणि सायली भोसले यांचा मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम वाई याठिकाणी आयोजित केला होता यासाठी वाईतील युवा नेते ओमकार जाधव व सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.तसेच श्री.उदय पोळ यांनी किल्ले प्रतापगड ,ऐतिहासिक वास्तू,मंदिर,घाट बद्दल दोन दिवस संगती राहून माहिती दिली. किल्ले प्रतापगड मोहिमेतील लहान मुल,महिला - पुरुष यांचा उत्साह बघून आम्हाला अजून बळ मिळालं. या किल्ल्यावर सर्वांनी तहान,भुकेला प्राधान्य न देता फक्त आणि फक्त किल्ले दर्शनासाठी महत्व देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति असलेली श्रद्धा प्रेम याला प्राधान्य देऊन या मोहिमेचे महत्व पटवून दिले. तसेच यावर्षीचा लहान शिवभक्त म्हणून कु.माही अगरवाल व महिला शिवभक्त म्हणून मनिषा पाटिल तर पुरुष शिवभक्त म्हणून पॅडी पाटील यांची निवड झाली. मोहिम यशस्वी झाली यासाठी प्रथमेश भास्कर पुंडे आणि सर्व सहकाऱ्यांचे कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.

## श्री संत सद्गुरु मोतीराम बाबा आश्रम श्री क्षेत्र सावरबंद येथे संत संमेलनाकरिता दि.२९-१-२०२६ ला दर्यापूर तालुक्यातील गुरुबंधू व गुरु भगिनी हजारोच्या संख्येने सावरबंद ला जाणार

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे: तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर :** साकोली तालुक्यातील श्री क्षेत्र सावरबंद येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही संत संमेलनाचा व विविध धार्मिक कार्यक्रम व गोपाळ काला होणार आहे दि. ३०-१-२०२६ जानेवारी पासून सुरू होणार संत सद्गुरु माऊली वसंत बाबा बेंदेवार यांचे विचार व मौलिक प्रवचन ऐकण्याकरिता व दर्शनाकरिता राज्यभरातून लाखोच्या संख्येने गुरुबंधू व गुरु भगिनी येत असतात दि.३० जानेवारीला संतांचे आगमन हवन निधी मंडप कार्य शनिवार दि. ३१ जानेवारीला सूर्योदय घटस्थापना ध्वजारोज नंतर आरती सकाळी ८:३० वाजता परमपूज्य श्री संत वसंत बाबा बेंदेवार यांचे आगमन व पूजनासह बाबांचे मौलिक प्रवचन होणार असून दुपारच्या सत्रात गुरुमाऊली वसंत बाबा यांचे सहयोगी श्री संत विठ्ठलदास बाबा मेंढे यांचे अमृतवाणी द्वारे प्रवचन होईल संध्याकाळी हरिपाठ व आरती रात्री ९. वा जेपासून जागृती कार्यक्रमानिमित्त ठराविक संतांचे देव




शोधन या विषयावर कीर्तन होईल रविवार दिनांक १. फेब्रुवारी रोजी पहाटे ४. वाजता काकड आरती हरिपाठ सकाळी ८. ते १० पर्यंत प्रभात फेरी स.१०ते११:३०वा. श्री संत सद्गुरु माऊली वसंतबाबा बेंदेवार यांचे करकमलाद्वारे गोपाल काला आरती व प्रसाद व दु.२:३०ते.९ वा. महाप्रसाद रात्री८:३० वा विड्याचा कार्यक्रम दि.२ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वा. गंगास्नान दुपारी .११ वा.ते १ पर्यंत राहील व ब्रह्मलीन सद्गुरु वासुदेव बाबा देवगडे. श्री संत यादवराव बाबा खेडेकर श्री संत सद्गुरु विदेही मोतीराम बाबा व भीमा मातोश्री बेंदेवार. श्रीमती शांताबाई ईटवले. श्री संत बंडू बाबा खडके. यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम होणार असून दुपारी २.ते.५ पर्यंत स्नेहा भोजनाचा कार्यक्रम संत संमेलनाचा समारोप होऊन रात्री उपदेश कार्यक्रम होणार आहे. या विविध धार्मिक कार्यक्रमांना गुरु बंधू गुरु भगिनी संत संमेलनाच्या कार्यक्रमासह धार्मिक कार्यक्रमाला उपस्थिती राहून तन मन धनाने आणि धान्य रुपयाने मदत करण्याचे आव्हान एका पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. उपदेश प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारला राहील. उपदेश कार्यक्रम दि. २-२-२०२६ ला होईल श्री संत सद्गुरू विदेही मोतीराम बाबा आश्रमाचे श्री क्षेत्र सावरबंद येथे बांधकाम सुरू असून दान दात्यांनी अंतकरणाने मदत करावी. सावरबंध हे गाव साकोली ते लखांदूर मार्गावर साकोली च्या दक्षिणेस ५.कि. मी अंतरावर आहे. तसेच भंडारा स्टेशन वरून व साकोली बस स्थानकावरून श्री क्षेत्र सावरबंद बसेसची व्यवस्था आहे. सोमवार दि.२-२-२०२६ सकाळी ७;००वा. गंगास्नान करिता सर्व भजनी मंडळी व दिंड्यांनी पहाटे आपली तयारी करून सज्ज रहावे असे आव्हान आश्रम समितीने केले आहे.

# युवा उदयोजक सागर भिसे यांनी घेतली कृषीमंत्री भरणे यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावचे युवा उदयोजक व भावी जिल्हा परिषद सदस्य यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची त्यांच्या अंथुर्ण गावातील निवासस्थानी भेट घेऊन सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील उमेदवारी आणि सार्वजनिक सामाजिक व विकासकामे याबाबत सविस्तर माहिती देऊन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी बाबत चर्चा करण्यात आली.



यावेळी सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील जेष्ठ मंडळीचीं भेट घेऊन पुढील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली यावेळी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष ऍड शुभम निंबाळकर लासुर्णे गावचे विद्यमान सरपंच सागर पाटील भवानीनगर येथील युवा नेते पै अजय सोनवणे आदी जेष्ठ नेते व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबईत गणेश नाईकांची एकहाती सत्ता ;नाईकांचे वर्चस्व कायम

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/प्रतिनिधी :** नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत ६५ जागांवर विजय मिळवला असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला केवळ ४१ जागांवर समाधान मानावे लागले. या निकालानंतर शहरात "नाईकांनी शिंदेंचा टांगा पलटी घोडे फरार केले" अशी चर्चा जोरदार रंगली आहे. भाजपचे मंत्री गणेश नाईक यांनी हे वर्चस्व साध्य करण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडे शिवसेनेशी युती नको, असा आग्रह केला होता, ज्यामुळे दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणूक लढले.युतीचा नकार आणि जागावाटप वादभाजप आणि शिवसेनेमध्ये केवळ निमित्तात्मक बैठक झाली असली तरी



जागावाटपावरून युती कोलमडली. भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनी गणेश नाईकांकडे १३ जागा मागितल्या होत्या, पण त्यांना केवळ चार जागाच मिळाल्या. यामुळे दोघांमध्ये तीव्र वाद झाला आणि नाईक यांनी "१११ जागा जिंकून दाखवा, मी राजकारण सोडेन" असे आव्हान दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत मंदा म्हात्रे यांचा समेट घडवला. त्यानंतर म्हात्रे बेलापूर मतदारसंघात प्रचारात उतरल्या, तर शिंदे यांनी रोड शो आणि सभा घेऊन उमेदवारांच्या पाठीशी ठाम उभे राहिले. ही निवडणूक खरेतर गणेश नाईक विरुद्ध एकनाथ शिंदे अशीच होती.आरोप-प्रत्यारोप आणि इशारेनिवडणूक काळात दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप सुरू होते. गणेश नाईक यांनी शिंदे यांना खुलेआम इशारा देत, "वरिष्ठांनी परवानगी दिली तर शिंदेंचा टांगासह घोडे बेपत्ता करेन. मला हलक्यात घेऊ नका" असे म्हटले. नाईक कुटुंबीयांनीही जबरदस्त प्रचार केला. निवडणूक प्रमुख माजी खासदार संजीव नाईक, पक्षप्रवेश करणारे माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, पुतण्या वैभव नाईक यांच्यासह नाईकांच्या सुनांनी प्रथमच घराबाहेर पडून प्रचारात भाग घेतला.संजीव नाईकांची खोचक टीकासंजीव नाईक यांनी विरोधकांवर हल्लाबोल करत, "यांनी कुणाकडून पैसे आणले, याची सर्व माहिती आमच्याकडे आहे" असे सांगितले. त्यांनी पुढे म्हटले, "८२ वेळा गणेश नाईक महापालिकेत गेले आणि नवी मुंबईकरांनी त्यांच्यावर विश्वास दाखवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत 'मी गणेश नाईकांच्या पाठीशी उभा आहे, काळजी करू नका' असे पाठबळ दिले. यामुळेच भाजपची सत्ता आली. कुणाचा टांगा आणि घोडे फरार झाले, हे निकालानंतर स्पष्ट झाले."या निकालाने नवी मुंबईत भाजपचे वर्चस्व कायम राहिले असून, गणेश नाईक यांच्या नेतृत्वाला मोठा बूस्ट मिळाला आहे.

# समाजसेवेक श्रीकृष्ण देशभ्रतार यांना राष्ट्रीय आयकॉन पुरस्कार-२०२६

**संतोष आमले**
**"दैनिक युवा आधार "**
**भंडारा :** केंद्रीय मानवाधिकार संघटन, नवी दिल्ली – महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने संविधान दिन, जागतिक मानवाधिकार दिन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, राजमाता जिजाऊ जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त जिल्हा परिषद सभागृह, भंडारा येथे भव्य संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय मानवाधिकार संघटन, नवी दिल्ली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'संविधान सन्मान स्पर्धा परीक्षा – २०२५' मध्ये उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके, सन्मानपत्रे तसेच भारतीय संविधानाची प्रत देऊन गौरविण्यात आले.

तसेच या प्रसंगी समाजात निर्भीडपणे व सातत्याने सामाजिक कार्य करणाऱ्या समाजसेवक श्रीकृष्ण एस.देशभ्रतार यांचा केंद्रीय मानवाधिकार संघटन, नवी दिल्ली द्वारा" राष्ट्रीय गौरव आयकॉन पुरस्कार - २०२६" देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास केंद्रीय मानवाधिकार संघटन, नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले, राष्ट्रीय कार्याध्यक्ष ॲड. विजयकुमार कस्तुरे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. देवानंद नंदागवळी, जिल्हा सरकारी वकील ॲड. विनोद भोले, भंडारा जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन रहांगडाले, कार्यकारी अभियंता श्री. व्ही. एस. चुरहे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान भारतीय संविधानाचे महत्त्व, मानवाधिकारांचे संरक्षण तसेच समाजहितासाठी कार्य करण्याची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देवानंद नंदागवळी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रो. शीलवंतकुमार मडामे यांनी केले. या यशस्वी आयोजनासाठी केंद्रीय मानवाधिकार संघटनाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राजकारणासाठी पेन कंपनीची बदनामी ?

## मार्कर पेन खरेदीवेळी बोठावरील शाई पुसते की नाही, याची तपासणीच झाली नाही का ?

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** राजकीय आरोप–प्रत्यारोपांच्या गदारोळात आता थेट एका खासगी पेन कंपनीला लक्ष्य केले जात असल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. मतदान प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या मार्कर पेनबाबत संशय व्यक्त करत संबंधित कंपनीवर थेट आरोप केले जात आहेत. मात्र या प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याआधी काही मूलभूत प्रश्न अनुत्तरितच राहिले आहेत.



सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मार्कर पेन खरेदी करताना किंवा वापरापूर्वी त्याची गुणवत्ता तपासली गेली होती का? शाई पुसली जाते की नाही, ती किती वेळ टिकते, याची चाचणी घेणे ही संबंधित यंत्रणेची प्राथमिक जबाबदारी होती. ती पार न पाडता थेट कंपनीवर आरोप करणे हे राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे.


तज्ज्ञांच्या मते, बाजारात उपलब्ध असलेल्या विविध मार्कर पेनमध्ये शाईच्या गुणवत्तेत फरक असतो. त्यामुळे निविदा प्रक्रियेत स्पष्ट निकष, प्रयोगशाळा चाचण्या आणि प्रत्यक्ष वापराची चाचणी आवश्यक असते. या प्रक्रिया पारदर्शकपणे राबवल्या असत्या, तर आज निर्माण झालेला वादच उद्भवला नसता.

दरम्यान, कंपनीची बाजू ऐकून न घेता तिला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही केला जात आहे. एखादी चूक प्रशासनाच्या पातळीवर झाली असेल, तर तिची जबाबदारी झटकून खासगी कंपनीवर ढकलणे योग्य ठरणार नाही, असे मत व्यक्त होत आहे.

राजकीय नफा-तोट्याच्या गणितात कोणत्याही उद्योगाची प्रतिमा मलीन करणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आरोपांआधी वस्तुनिष्ठ चौकशी, तांत्रिक अहवाल आणि जबाबदारीची स्पष्टता आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरत आहे.

# स्ट्रॉबेरी उत्पादनासह थेट विक्री मॉडेल

नाशिकच्या पश्चिम पट्ट्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांना फाटा देत स्ट्रॉबेरी उत्पादनात ओळख निर्माण केली आहे. शेतकऱ्यांच्या 'शोधक' वृत्तीला आणि राबणाऱ्या हातांना यश मिळाल्याने बोरगाव परिसर स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी नावारूपास आला आहे. उत्पादनासोबत काढणीपश्चात हाताळणी, प्रतवारीसह विक्री कौशल्यही विकसित करून उत्पन्नवाढ व प्रगती या शेतकऱ्यांनी साधली आहे.





पूर्वी भात, नागली, वरई या जिरायती पिकांसह थोड्याफार प्रमाणात भाजीपाला पिकांवर बोरगाव परिसरातील गावांचे अर्थकारण अवलंबून होते. तुटपुंज्या उत्पन्नामुळे शहरांकडे स्थलांतरही करावे लागे. अशा स्थितीत नाशिकच्या पश्चिम पट्ट्यातील सुरगाणा, कळवण, दिंडोरी व पेठ तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी फाटा देत स्ट्रॉबेरी उत्पादनात ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे बोरगाव परिसर स्ट्रॉबेरी उत्पादनात नावारूपास आला असून, येथील मातीत पिकणाऱ्या लालचुटूक स्ट्रॉबेरीची ग्राहकांनाही भुरळ पडत आहे.

पीक पद्धतीत झालेला बदल म्हणजे शेतकऱ्यांची 'शोधक' वृत्तीचे आणि राबणाऱ्या हातांचे यश म्हणावे लागेल. महाबळेश्वरच्या बरोबरीने बोरगावचं नाव घेतलं जाणं, ही इथल्या मातीची आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या घामाची मोठी पावतीच आहे.

पूर्वी दिवाळी संपली, की बोरगाव भागातील बहुतांश आदिवासींची पोटापाण्यासाठी वणवण सुरू होई. आता भात पिकानंतर कमी कालावधीत येणाऱ्या व बऱ्यापैकी नगदी उत्पन्न देणाऱ्या 'स्ट्रॉबेरी' या फळपिकाची जोड मिळाली आहे. त्यामुळे सुरगाणा तालुक्यात घाटमाथ्यावरील बोरगाव घाटमाथा परिसर, कळवण तालुक्याच्या पश्चिम भागात पळसदरचे खोरे, दिंडोरीत तालुक्यात वारे, टिटवे, करंजखेड परिसर तर पेठ तालुक्यात स्ट्रॉबेरीच्या लागवडी विस्तारल्या आहेत.

डोंगराळ भाग, लागवडीसाठी अनुकूल असे थंड वातावरण व मातीत राबण्याची तयारी यामुळे गेल्या दहा वर्षांत स्ट्रॉबेरीखालील क्षेत्रात वाढ होत गेली आहे. वीस वर्षांपूर्वी हाताच्या बोटांवर मोजता येईल, इतक्या शेतकऱ्यांकडे दिसणारे हे पीक आता शेकडो शेतकरी आणि ११०० हेक्टर क्षेत्रांपर्यंत विस्तारले आहे. हा केवळ पीक बदल नाही, सामान्य आदिवासी शेतकऱ्यांच्या जीवनात आलेले संधीचे नवे पर्व ठरत आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली.

**तंत्र अभ्यासल्याने जीवनमान उंचावले**

अभ्यास दौरे, प्रक्षेत्र भेटीतून पीक व्यवस्थापन, वाण बदल असे काळानुरूप येथे झाले. त्यातून तंत्रज्ञानाचा अवलंब वाढला आहे. उदा. पाण्याची कमतरता असल्याने सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर वाढला आहे. ओलावा टिकवणे आणि तण नियंत्रणासाठी म्हणून मल्चिंग पेपरवर लागवडीकडे कल वाढला आहे. कृषी विभागाच्या माध्यमातून सूक्ष्म सिंचन, मल्चिंग पेपरसाठी अनुदानासोबतच अभ्यास दौऱ्यांचे आयोजन केले जाते. सुरुवातीला 'चांडलर', नंतर 'सेल्वा' वाणाची लागवड होत असे.

त्यात बदल होत आता 'स्वीट चार्ली' हा वाण येथे रुजल्यामुळे उत्पादकताही वाढली आहे. पुढे 'विंटरडाउन', 'एम-२', 'मेलिसा', 'मुरानो', 'पार्थेनोप', 'नाबिला', 'एसए' असे वाण घेतले जात आहेत. या अधिक उत्पादनक्षम, रोगप्रतिकारक व गुणवत्ता देणाऱ्या वाणांमुळे बोरगावच्या स्ट्रॉबेरीचा केवळ स्थानिक बाजारपेठेतच नाही, तर मुंबई, पुणे, नागपूरसारख्या मोठ्या शहरांसोबतच शेजारच्या गुजरात राज्यातील बाजारपेठांमध्ये दबदबा निर्माण झाल्याचे शेतकरी सांगतात.

**'उत्पादक ते ग्राहक' थेट विक्री**

नाशिक, शिर्डी, सापुतारा व सप्तशृंगी गडाकडे जाणाऱ्या पर्यटकांची या भागात वर्दळ असते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांनाही या फळाची भुरळ पडल्याशिवाय राहत नाही. थेट उत्पादकांच्या शेतातून ग्राहकांपर्यंत होणाऱ्या विक्रीमुळे शेतकऱ्यांनाही चांगला दर मिळत आहे. अनेकांनी कृषी पर्यटन सुरू केले असून, तिथे पर्यटक स्वतः शेतातून स्ट्रॉबेरी काढून खरेदी करतात. ग्रामीण महिलांना स्ट्रॉबेरी काढणी, प्रतवारी आणि पॅकिंग कामातून उत्तम रोजगार मिळत आहे. परिणामी शहराकडील स्थलांतर थांबले आहे.

कृषी शिक्षण घेत अनेक तरुण स्ट्रॉबेरी लागवडीत उतरले आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानही आदिवासी पट्ट्यात स्थिरावले आहे. एकेकाळी महाराष्ट्रात स्ट्रॉबेरी म्हटले, की आठवायचे ते महाबळेश्वर. त्याला आता नाशिकच्या आदिवासी पट्ट्याने आव्हान दिले आहे. उत्पन्नामुळे शेतकऱ्यांच्या हातात चांगला पैसा खेळत असून, त्यांच्या जीवनमानात बदल झाला आहे.

**सध्याची स्थिती**

जिल्ह्यातील एकूण सरासरी लागवड क्षेत्र...११०० हेक्टर

स्ट्रॉबेरी उत्पादक...१५०० शेतकरी

सरासरी उत्पादकता (प्रति एकरी) ...५ ते ६ टन

थेट विक्रीतून रुजली व्यावसायिकता (ठळक बाबी)

बोरगाव परिसरात महाबळेश्वरच्या गुणवत्तेप्रमाणे गोड, रसाळ स्ट्रॉबेरीचे उत्पादन.

मालाची टिकवणक्षमता वाढण्यासाठी थंड वातावरणात ऊन पडण्यापूर्वी सकाळी ७ ते ९ व मागणीनुसार दिवसभर काढणी.

फळांचा आकार, रंगानुसार वर्गवारी.

जास्त पिकलेली फळे वेगळी करून, मध्यम पक्व टिकवणक्षम मालाचा मुंबई, राजकोट, अहमदाबाद, सुरत, जुनागढ, गोंडल, हैदराबाद, बंगळूर, गोरखपूर, लखनौ या बाजारपेठांत पुरवठा.

शेतकरी स्वतः पॅकिंग करतात. त्यातून फळाला प्रीमिअम दर्जा व किंमत मिळते. २५० ग्रॅम प्लॅस्टिक पनेट तसेच अर्धा किलो कोरूगेटेड डिझाईनचेही बॉक्स पॅकिंग. सुपर मार्केटमध्येही मागणीनुसार पुरवठा.

'बोरगाव स्ट्रॉबेरी'असा ब्रँड तयार केला.

नाशिक-सापुतारा, नाशिक सप्तशृंग गड मार्गावर २०० हून अधिक शेतकऱ्यांनी रस्त्यालगत स्टॉल्स उभारले आहेत. या थेट विक्रीतून शेतकऱ्यांत व्यावसायिकता रुजली. त्यातून मध्यस्थांची साखळी मोडीत काढल्याने २० ते ३० टक्के उत्पन्नवाढ साधली.

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in   E mail - dainikyuvakaadhar@gmail.com   facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक

# युवक आधार

मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३० ■ शनिवार, १७ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514








स्वयंभु श्री गजानन

२ गाव
१ गणपती

|| आई एकविरा प्रसन्न || || भवानी माता प्रसन्न || || श्री गजानन प्रसन्न || || आई जोगेश्वरी प्रसन्न || || जय हनुमान प्रसन्न ||

रजि. नं. ए११७७/रायगड

## श्री गणपती देवस्थान-धाकटा खांदा व मोठा खांदा

ता. पनवेल, जि. रायगड

समस्त भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माघ शु. ४ शके १९४७ गुरुवार, दि. २२-०१-२०२६ रोजी श्री गणपती देवस्थान, धाकटा खांदा येथे **"श्री गणेश जयंती उत्सव"** साजरा होत आहे, तरी सर्व भाविकांनी भजन श्रवण सुखाचा व सुटंवडा प्रसादाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

**महाप्रसाद - दुपारी १२ ते ३ पर्यंत**

स र्व ग णे श भ क्तां चे

हा र्दि क स्वा ग त

### श्री गणेश जयंती उत्सवानिमित्त कार्यक्रम



पहाटे ३.०० वा. : **"श्रीं" ची काकड आरती**
श्री साई भक्त मंडळ, धा. खांदा (श्री. चंद्रकांत शालिक म्हात्रे)

पहाटे ३.३० वा. : **श्री गणपतीचा अभिषेक**
पुजा व आरती (पुरोहित - नंदकुमार जोशी)

पहाटे ५.०० वा. : **तुला पुजन**

सकाळी ६.३० वा. : **श्री गजानन हरिपाठ मंडळ (धा. खांदा)**
बुवा-श्री. दत्तात्रेय भगत, मृदुंगमणी-श्री. समीर भगत, चालक-श्री. कृष्ण म्हात्रे, श्री. अजीत भगत, श्री. प्रकाश भोईर, श्री. हरिभाऊ म्हात्रे, श्री. रामचंद्र शेळके, श्री. गजानन भगत, श्री. हनुमान भगत

सकाळी ८.०० वा. : **श्री गणेश वारकरी भजन मंडळ (धा. खांदा)**
ह.भ.प. श्री जितेंद्र डोंगरे, श्री संतोष म्हात्रे, श्री. बाळकृष्ण म्हात्रे, श्री. मधुकर भगत, श्री. अनंता म्हात्रे, श्री. परशुराम म्हात्रे, पखवाज-ह.भ.प. कु. जयेश डोंगरे

सकाळी ९.०० वा. : **बाळ गणेश भजन मंडळ, (धा. खांदा)**
गायिका - कु. निशिता डोंगरे, सौ. अपेक्षा पाटील, सौ. प्रांजली भगत, सौ. कल्याणी भोईर, कु. ऋतिका भगत, कु. मिताली म्हात्रे, कु. प्रचिता भगत, कु. ऋषिता तांबडे, कु. पूर्वा म्हात्रे, कु. अक्षरा म्हात्रे, तबला - कु. प्रथम, म्हात्रे, हार्मोनियम - श्री. सुरेश गोरे, चालक - श्री. नंदकुमार म्हात्रे, श्री. हरिभाऊ म्हात्रे

सकाळी १०.०० वा. : **गोंधळी परिवार महिला भजन मंडळ (मोठा खांदा)**
गायिका - सौ. तनस्वी गोंधळी, मृदुंगमणी - श्री. विकास भगत (चिंचवली), चालक - श्री. सदाशीव गोंधळी





सकाळी ११.३० वा. : **भक्तीधारा (चिरले-उरण)**
गायिका - कु. मृणाली विकास ठाकूर, पखवाज : कु. आयुष म्हात्रे
तबला - कु. विनित ठाकूर, निवेदन - श्री. चेतन पाटील

दुपारी १.०० वा. : **राधा कृष्ण भजन मंडळ (कुंडेवहाळ)**
स्वररत्न - संदीप बुवा कडू, पखवाज - ज्ञानेश्वर खरे

दुपारी २.३० वा. : **श्री. दत्त प्रासादिक भजन मंडळ (आदई)**
बुवा श्री. गणपत म्हात्रे (धा. खांदा) व श्री. श्रीधर काकडे (आदई)
मृदुंगमणी - श्री. चेतन पाटील (वावंजे), चकवा - श्री. मकरंद म्हस्कर (टेंभोडे)
चालक - श्री. भरतबुवा भंडारी, श्री. विश्वास पाटील

सायं. ४.०० वा. : **श्री गणपतीचा पालखी सोहळा**
सोबत गायकवृंद - ह.भ.प. प्रभाकर महाराज लबडे, अविनाश बुवा जाधव, विश्वनाथ पाटील, दत्तादादा पाटील, नयन ठाकूर, कमलाकर भोईर, विश्वास मानकामे, कार्तिक काठावले.
पखवाज - करण पाटील, सोहम पाटील, अशोक ठाकूर, लक्ष्मण जुमारे, दिनेश पाटील, निर्माण ठोंबरे, निशांत कार्ले
विणेकरी - ह.भ.प. नारायण मगर महाराज-भाताण, ह.भ.प. राम ना. भोईर-भाताण
साथकरी - करमाती आई भजन मंडळ-शिवाजी नगर, श्री. दत्त माऊली भजन मंडळ-भाताण, जय हरी माऊली ग्रुप-खालापुर, पनवेल



रात्री ९.०० ते ११.०० : **सोंगी भारुड**
**श्री जय हनुमान प्रासादिक सोंगी भारुड मंडळ, जांबरुक, ता. खालापुर, खोपोली.**
कलाभुषण - सुधाकर बुवा पाटील (समाजयोद्धा राज्यस्तरीय समाज भुषण)
सुत्र संचालक - पवन सुधाकर पाटील, सजावट - तुलशीराम कर्णुक, विलास तांडेल
किबोर्ड - रामदास जाधव, लावणी सम्राट - सुरेश साठे
गर्जा रायगड रत्नभुषण पुरस्कार - मधुकर म्हात्रे




❊ आपले नम्र ❊

**श्री गणपती देवस्थान धाकटा खांदा**
**ग्रामस्थ मंडळ धाकटा खांदा व मो. खांदा**

| ❊ अध्यक्ष ❊ | ❊ उपाध्यक्ष ❊ |
|---|---|
| श्री. दत्तात्रय हाशा म्हात्रे | श्री. वासुदेव दत्तात्रेय म्हात्रे |
| ❊ सचिव ❊ | ❊ खजिनदार ❊ |
| श्री. अविनाश भगवान पाटील | श्री. नरेश अनंता पाटील |

❊ विश्वस्त ❊

श्री. प्रकाश काना पाटील    श्री. अमित अनंता पाटील